cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र वर्ष – ४ अंक–१८५ रविवार, दि.२७ ऑक्टोबर २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

## संपादकीय

# कुटुंबशाही !

ज्या राजकीय पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत ते पाहता एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते, ती म्हणजे एकाच घरात विविध पक्षांकडून उमेदवारी मिळालेले (मिळवलेले) उमेदवार आहेत. म्हणजे कुणीही जिंकला तरी सत्ता आपल्याच घरात नांदणार चित भी मेरी, पट भी मेरा असे. भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे खासदार आहेत. त्यांचा पुत्र नितेश राणेला भाजपने कणकवली मतदारसंघातून आमदारकीचे तिकिट दिले आहे. दुसरा पुत्र निलेश राणेसुद्धा उमेदवारीसाठी इच्छुक होता परंतु भाजपने त्याला नाकारले होते.

## गलिच्छ भाषा हिच भाजपाची 'लाडकी बहीण'बद्दलची मानसिकता !

मुंबई: लाडकी बहीण म्हणून मतांसाठी १५०० रुपये देण्याचा गवगवा करणाऱ्या भारतीय जनता पक्ष युतीची माता भगिनींबद्दलची खरी मानसिकता काय आहे हे सर्वांनी ऐकले आहे. भाजपाचा माजी खासदार सुजय विखेच्या संगमनेरमधील सभेत वसंत देशमुख या भाजपा पदाधिकाऱ्याने विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांची कन्या डॉ. जयश्रीबद्दल अत्यंत हिन, निर्लज्ज व पातळी सोडून भाषा वापरली. वसंत देशमुखांनी वापरलेली भाषा हिच भाजपाची महिलांबद्दलची खरी मानसिकता दाखवते, अशा विकृत मानसिकतेला माता भगिनीच त्यांची जागा दाखवतील, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले म्हणाले.

# मराठवाड्यात नुकसानीचे क्षेत्र २ लाख २९ हजार हेक्टरवर !

## शेतकऱ्यांवर संकटाची मालिका, शासकीय मदतीची गरज

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यात १ ऑक्टोबर पासून झालेल्या पावसामुळे प्रशासनाच्या प्राथमिक अंदाजानुसार नुकसान झालेले क्षेत्र २ लाख २९ हजार ४४६ हेक्टरवर पोहोचले आहे. दिवसेंदिवस या क्षेत्रामध्ये वाढ होताना दिसते आहे. शेतकऱ्यांसाठी हा मोठा धक्का असून, दरवर्षी कोणते ना कोणते संकट शेतकऱ्यांवर सातत्याने येताना दिसत आहे. आता नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदतीची गरज आहे.**

सप्टेंबरमध्ये पावसाने मराठवाड्यातील शेती पिकाचे मोठे नुकसान केल्यानंतर ऑक्टोबर मध्येही काढणीच्या वेळी आलेल्या पावसाने शेती पिकांना मोठा दणका दिला. प्रशासनाच्या प्राथमिक माहितीनुसार, मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ४३३ गावातील १ लाख ७२ हजार ९२४ शेतकऱ्यांच्या १ लाख ३ हजार ३६२ वरील जिरायत पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. दुसरीकडे बीड जिल्ह्यातील ३२ गावातील १० हजार २३२ शेतकऱ्यांच्या ४८५२ हेक्टरवरील बागायत पिकांना पावसाने दणका दिला आहे. लातूर जिल्ह्यातील १६० गाव शिवारातील ८१ हजार ९६६ शेतकऱ्यांच्या ७ हजार ६५६ हेक्टरवरील जिरायत पिकांचे नुकसान केलं आहे. याशिवाय धाराशिव जिल्ह्यातील १३० गाव शिवारातील ७९ हजार ८८० शेतकऱ्यांच्या ६३५७६ हेक्टरवरील जिरायत शेती पिकाची नुकसान केले आहे. खरिपातील शेती पिकाचे दोन-तीन टप्प्यात मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने झालेला उत्पादन खर्च भरून निघेल की नाही हा प्रश्न आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांच्या संपूर्ण अशा येणाऱ्या रब्बी हंगामावर अवलंबून असणार आहेत.

### नुकसानीसह जिवीत हानी...

एक ऑक्टोबर पासून आतापर्यंत आलेल्या नैसर्गिक आपत्तीत मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील ५, जालना, परभणी, नांदेड व लातूर जिल्ह्यातील प्रत्येकी एक मिळून नऊ व्यक्तींचा जीव गेला आहे. याशिवाय तब्बल १३८ जनावरांचाही या नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झाला आहे. त्यामध्ये छत्रपती संभाजीनगरमधील १६, जालन्यातील १४, परभणीतील ९, हिंगोलीमधील ३, नांदेडमधील ५, बीडमधील ३३, लातूरमधील १३ व धाराशीवमधील ४५ जनावरांचा समावेश आहे.

# मनोज जरांगे–उदय सामंतांची पुन्हा भेट!

**जालना । प्रतिनिधी**

राज्यात विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग आला आहे. राजकीय वर्तुळात अनेक घडामोडी घडत असून, भेटीगाठी घेतल्या जात आहेत. याच पार्श्वभूमीवर आता उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पुन्हा एकदा अंतरवाली सराटीत मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली आहे. यावेळी दोघांमध्ये २५ मिनिटे चर्चा झाल्याची माहिती समोर आली आहे. तसेच, उदय सामंत यांच्यासोबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे ओएसडी मंगेश चिवटे देखील उपस्थित होते.

विधानसभा निवडणुकीसाठी सर्व पक्षांच्या उमेदवारी याद्या जाहीर झाल्यानंतर आम्ही निर्णय घेणार आणि उमेदवार जाहीर करणार, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले होते. तसेच, उमेदवारांची चाचपणी देखील सुरू केली आहे, असेही मनोज जरांगे पाटील ◀◀ पान २ वर

# माजलगावातून जयसिंह सोळंके, परळीत हाबाडा?

## शरद पवारांचा मुंडे, सोळंकेंच्या विरोधात नवा डाव?

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील ५ पैकी ३ मतदार संघात शरद पवारांनी आपले उमेदवार जाहीर केले असले तरी माजलगाव आणि परळी मतदार संघातील इच्छुकांना अजूनही वेटींगवर ठेवले आहे. कृषीमंत्री धनंजय मुंडे आणि आ. प्रकाश सोळंके यांना पराभूत करण्यासाठी शरद पवार हे वेगळा डाव टाकण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे. माजलगावात काका प्रकाश सोळंके विरुध्द पुतणे जयसिंह सोळंके तर परळीत धनंजय मुंडे विरुध्द रमेश आडसकर अशी रोमहर्षक लढत करण्याचा बेत पवारांचा असल्याचे बोलले जात आहे.**

परळीमध्ये महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या विरोधात पवारांचा मावळा अजूनही ठरला नाही. राजेभाऊ फड, संजय दौंड, राजेसाहेब देशमुख यांची नावे चर्चेत असले तरी पवारांना ◀◀ पान २ वर

### जयसिंहांना फोनावर फोन?

जयसिंह सोळंके यांना पवारांच्या पक्षातील काही दिग्गज नेत्यांचे फोनावर फोन येत असल्याची चर्चा असून कोणत्याही परिस्थितीत जयसिंह सोळंके यांना आपल्याकडे घेऊन उमेदवारी देण्यासाठी काहीजण कामाला लागले असल्याचे बोलले जात आहे. मात्र जयसिंह सोळंके हे तुतारी हाती घेण्यासाठी इच्छुक नसल्याचे म्हटले जात आहे.

### घर फुटू नये म्हणून माघार

जयसिंह सोळंके यांना तुतारीकडे घेण्यासाठी जिल्ह्यातील काही तुतारीचे उमेदवार तर काही बारामतीचे नेते सुध्दा संपर्क करीत असल्याची माहिती असून केवळ घर फुटू नये म्हणून जयसिंह सोळंके यांनी माघार घेतल्याचे म्हटले जात आहे.

### "अभी नही तो कभी नही!

*यावेळीच्या विधानसभा निवडणुकीत जयसिंह सोळंके यांना आमदार होण्याची मोठी संधी असून मराठा समाजाची सुध्दा हीच इच्छा असल्याचे म्हटले जात आहे. स्वत:च निवडणुक लढवायची होती तर अगोदर वारसदार का घोषित केले? असा सवाल आता जयसिंह समर्थक उपस्थित करीत आहेत. पुढे पाच वर्षानंतर २०२९ च्या निवडणुकीत प्रकाशदादा हे स्वत:च्या मुलाला किंवा सुनेला लाँच करणार नाहीत याची तरी काय खात्री आहे? असा प्रश्न सुध्दा उपस्थित केला जात आहे. त्यामुळे अभी नही तो कभी नही! अशी स्थिती सध्या मतदार संघात आहे.*

### भाजप जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख

बीड– भाजपचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी राजीनामा देऊन शरद पवार गटात प्रवेश केल्यानंतर रिक्त झालेल्या पदी जिल्हाध्यक्ष म्हणून कडा येथील शंकर देशमुख यांची निवड करण्यात आली आहे. ही निवड भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे. लोकसभा निवडणुकीनंतर भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के वेगवेगळ्या कारणामुळे चर्चेत आले होते. पक्षनिष्ठा या मुद्द्यावर त्यांच्यावर ◀◀ पान २ वर

## रामकृष्ण बांगर यांना अटक

बीड : पाटोदा येथील महात्मा फुले बँकेच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांच्या घोटाळा प्रकरणातील आरोपी रामकृष्ण बांगर यांना वाशिम येथून अटक करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ यांच्या विशेष पथकाने ही कारवाई केली. ऐन विधानसभा निवडणुकीदरम्यान बांगर यांना ही अटक करण्यात आली आहे. रामकृष्ण बांगर यांनी शैक्षणिक संस्था, दूध डेरी, महात्मा फुले अर्बन बँक यासारख्या संस्था स्थापन करून राजकारणात आपली छाप उमटवली होती. मात्र, राजकीय हितसंबंधाचा वापर करून सहकारी ◀◀ पान २ वर

## आण्णांना विजय करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे–शिवराज पवार

### » काकांच्या प्रचारार्थ पुतण्या शिवराज पवार मैदानात

**गेवराई । प्रतिनिधी**

मतदारसंघातील संघातील जनतेने आमदार लक्ष्मण आण्णांनच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत दहा वर्ष सेवा करण्याची संधी दिली त्या संधीचे आण्णांनी सोन करून मतदारसंघात गाव तिथे रस्ता करत दळणवळण सुकर केले तसेच अनेक गावांत जलयुक्त शिवार योजनेंतर्गत मतदारसंघात अनेक बंधारे बांधून जलसिंचन करण्याचे काम केले आहे . तर गोरगरीब लोकांना आपल्या हाक्काचे ◀◀ पान २ वर

## परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी उभारणार ६०० कोटींचा अतिरिक्त प्रकल्प

### धनंजय मुंडे यांच्या प्रयत्नांना यश: स्थानिकांना मोठ्या प्रमाणात मिळणार रोजगार

**परळी वै. । प्रतिनिधी**

**बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीला दिलेल्या विश्वासामुळे कंपनीने त्यांच्या परळी येथील सिमेंट ग्रायंडिंग युनिटच्या उत्पादन क्षमतेमध्ये पाच पटीने वाढ करण्याचा निर्णय घेतला असून याठिकाणी सुमारे ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक कंपनीने दोन टप्प्यात करणार असल्याचे जाहीर केले आहे.** ◀◀ पान २ वर

## पंकजा मुंडे, अशोक चव्हाणा भाजपचे स्टार प्रचारक

### पंतप्रधान मोदींसह ४० नेत्यांच्या समावेश

**मुंबई । प्रतिनिधी**

**महाराष्ट्र निवडणुकीसाठी भाजपने स्टार प्रचारकांची यादी जाहीर केली आहे. या नावांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री जेपी नड्डा, अमित शहा यांसारख्या दिग्गज नेत्यांच्या नावांचा समावेश असून यांसह भाजपाच्या राज्यातील नेत्या पंकजा मुंडे, अशोक चव्हाण आणि इतर नेत्यांचा समावेश आहे.**

राज्यातील २८८ सदस्यीय विधानसभेसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून, २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे. दरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, नितीन गडकरी, ◀◀ पान २ वर

## युवासेनेच्या बीड जिल्हाप्रमुखपदी अभिषेक दिवे पाटील यांची निवड

### जिल्हाभरातील युवासैनिकात नवचैतन्य संचारले

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या अनेक महिन्यापासुन बीड जिल्ह्यातील युवासेनेची कार्यकारणी रिक्त होती. दैनिक सामना या मुखपत्रातुन बीड जिल्ह्यातील युवासेनेची कार्यकारणी जाहिर करण्यात आली. बीड युवासेनेच्या जिल्हाप्रमुखपदी अभिषेक दिवे यांची निवड करण्यात आली. युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे व युवासेनेचे सचिव वरुण सरदेसाई यांचे अत्यंत ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२६ ऑक्टोबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १०.०० क्विंटल | | | |
| | २,८०० | ३,२६० | २,९६१ |
| ज्वारी/हायब्रिड : ५९.०० क्विंटल | | | |
| | १,९०० | ३,१०० | २,३२९ |
| मका/लोकल :११.५० क्विंटल | | | |
| | २,२४१ | २,२४१ | २,२४१ |
| तूर :७.५० क्विंटल | | | |
| | ८,६०० | ८,६०० | ८,६०० |
| उडीद : ४९.०० क्विंटल | | | |
| | ६,६०० | ७,६७० | ७,३०२ |
| बाजरी: २५.५० क्विंटल | | | |
| | २,३११ | २,७४१ | २,५३२ |
| मुग : १४.०० क्विंटल | | | |
| | ६,००१ | ६,९०० | ६,६०० |
| सोयाबीन: ७०५.५० क्विंटल | | | |
| | ३,५०१ | ४,४५० | ४,१४४ |
| हरभरा: १.०० क्विंटल | | | |
| | ६,००१ | ७,००० | ६,५०० |

# क्षीरसागरांचा संदिपच बीडमध्ये पवारांच्या राष्ट्रवादीत पावरफुल्ल

## पक्षातून कमालीचा विरोध तरीही मिळवलीच उमेदवारी!

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या महिनाभरापासून बीड विधानसभा मतदार संघात शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या उमेदवारीची संपुर्ण राज्यात चर्चा आहे. आ. संदिप क्षीरसागर यांचा पत्ता कट होणार?, मराठा चेहऱ्याला उमेदवारी दिली जाणार, पुतण्याला डावलून काका जयदत्त क्षीरसागर यांना उमेदवारी दिली जाणार, अशा चर्चा होत्या. शिवाय संदिप क्षीरसागर यांना उमेदवारी मिळू नये यासाठी पक्षातीलच अनेकांनी देव फळ मिळाले आहे. पवारांच्या बीड राष्ट्रवादीत संदिप क्षीरसागरच पावरफुल्ल असल्याचे पुन्हा एक सिध्द झाले असून बीडमधून त्यांना शरद पवार गटाची उमेदवारी जाहीर झाली आहे.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष फुटल्यानंतर बीड जिल्ह्यातील ४ आमदारांपैकी संदिप क्षीरसागरच शरद पवारांसोबत राहीले होते. पुढे लोकसभा निवडणुकीपुर्वी बजरंग सोनवणे यांनी प्रवेश केला ◀◀ पान २ वर

पाण्यात ठेवले मात्र शेवटी निष्ठेला

### उमेदवारी व संदिप भैय्यातील रंजक कहानी

संदिप भैय्यांना उमेदवारी मिळू नये म्हणून पक्षातीलच काही नेते मंडळी हे राजेश टोपे आणि जयंत पाटील यांच्याकडे गेले असल्याची चर्चा असून त्यावेळी पाटील आणि टोपे यांनी आलेल्या सर्वच नेत्यांना बीड उमेदवारीचा विषय आमचा नसून तो साहेबांचा आहे. आम्ही साहेबांना सांगू शकत नाहीत, असे स्पष्टपणे त्यांनी सांगितल्याचे बोलले जात आहे.

### जयदत्त अण्णा, संदिप भैय्यांच्या पाठीशी राहतील का?

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे सुध्दा निवडणुक लढवण्यासाठी इच्छुक असून त्यांनी जोरदार तयारी केली आहे. त्यांचे पुतणे संदिप यांना शरद पवार गटाची उमेदवारी मिळाली असून सध्या मराठा विरुध्द ओबीसी असा संघर्ष सुरु असल्याने जयदत्त क्षीरसागर काय भुमिका घेतात हे महत्वाचे ठरणार आहे. ते निवडणुक लढवतात की संदिप भैय्यांच्या पाठीशी राहतात? हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

cmyk

## अग्रलेख

# कुटुंबशाही !

ज्या राजकीय पक्षांनी आपले उमेदवार जाहीर केले आहेत ते पाहता एक गोष्ट प्रामुख्याने नजरेत भरते, ती म्हणजे एकाच घरात विविध पक्षांकडून उमेदवारी मिळालेले (मिळवलेले) उमेदवार आहेत. म्हणजे कुणीही जिंकला तरी सत्ता आपल्याच घरात नांदणार चित भी मेरी, पट भी मेरा असे. भाजपचे ज्येष्ठ नेते नारायण राणे खासदार आहेत. त्यांचा पुत्र नितेश राणेला भाजपने कणकवली मतदारसंघातून आमदारकीचे तिकिट दिले आहे. दुसरा पुत्र निलेश राणेसुद्धा उमेदवारीसाठी इच्छुक होता परंतु भाजपने त्याला नाकारले होते. त्यामुळे निलेशने एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची वाट धरली आणि कुडाळ मतदारसंघातून उमेदवारी मिळवली.

नारायण राणे स्वत: खासदार, त्यांच्या एका मुलाला उमेदवारी मिळाली तरीही दुसऱ्या मुलाला उमेदवारी मिळावी हा अट्टाहास कशासाठी? नारायण राणे यांचे अनेक विश्वासू कार्यकर्ते आहेत. त्यापैकी एका कार्यकर्त्याला मोठे होण्याची संधी का नाकारण्यात आली? कार्यकर्ते केवळ नेत्यांचे आदेश पाळण्यासाठी आणि सतरंज्या उचलण्यासाठी आहेत काय? राजकीय पदे नेहमी आपल्याच घरात ठेवण्याचा अट्टाहास का? 'हे विश्वचि माझे घर' ऐवजी 'हे घरच माझे विश्व' ही प्रवृत्ती राजकीय नेत्यांमध्ये वरचेवर बळावत चालली आहे. माजी मंत्री गणेश नाईक यांना भाजपने ऐरोली मतदारसंघातून उमेदवारी दिली. त्यांचे पुत्र संदीप नाईक यांनाही उमेदवारी हवी होती परंतु ती देण्यास भाजपने असमर्थता दाखवली तेव्हा संदीप नाईक यांनी थेट शरद पवार गटात प्रवेश करत तुतारी हाती घेतली. म्हणजे एकाच कुटुंबात सत्ता कशी राहील हेच राजकीय घराण्यांकडून सातत्याने बघितले जाते. महाराष्ट्रातील नव्हे देशातील राजकारण केवळ काही घराण्यांपुरते सीमित असल्याचे दिसून येते.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थात ७३ आणि ७४ व्या घटनादुरुस्तीने सर्वसामान्य घरातील कार्यकर्त्यांना सरपंच, पंचायत समिती सभापती, जिल्हा परिषद अध्यक्ष अशी पदे मिळत आहेत. मात्र, त्यांच्यासाठी अजूनही विधानसभा आणि लोकसभेची दारे उघडल्याचे दिसून येत नाही. खरे पाहता सत्ता ही सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली पाहिजे. वंचित समाज घटकातील नेते जेव्हा या देशाच्या सत्ताकारणाच्या पटलावर जातील तेव्हाच ते आपल्या शोषित-पीडित समाजाच्या वेदना जाणून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न करतील. महाराष्ट्रात घराणेशाहीचे राजकारण सातत्याने सुरू आहे. काही दशकांपूर्वी म्हणजे १९६० ते ८० च्या दशकापर्यंत पक्षाकडून सर्वसामान्य आणि काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उमेदवारी दिली जायची. मात्र, सर्वसामान्य कार्यकर्त्याला एकदा का संधी दिली की, तो देखील प्रस्थापित नेता बनू लागला आणि त्याचे पाय जमिनीवर राहिनासे झाले. याचे उदाहरण म्हणजे खासदार निलेश लंके. ते खासदार झाल्यानंतर पारनेर मतदारसंघात सर्वसामान्य कार्यकर्त्याला उमेदवारी देण्याऐवजी त्यांच्या पत्नी राणीताई लंके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. यावरून सर्वसामान्य कार्यकर्त्याचा विचार केला जात नाही हेच खरे. जर सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी दिली तर तो आपल्याला धोबीपछाड मारेल अशी भीती या नेत्यांना वाटत असावी. त्यामुळे सर्व पदे आपल्या भोवतीच ठेवण्याचा या नेत्यांचा प्रयत्न असतो. विधानसभा निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यानंतर दलबदलूंचा, आयाराम-गयारामांचा सुळसुळाट सुरू झाला. ती प्रवृत्ती वाढण्याचे मुख्य कारण म्हणजे एकदा राजकारणात प्रवेश केल्यानंतर आणि सत्तापदावर गेल्यानंतर त्या ठिकाणी कुटुंबशाही निर्माण करण्याची प्रवृत्ती. गत सात दशकांपासून हेच चालू आहे. भारतीय माणसाचे सरासरी आयुर्मान ७० वर्षांचे आहे परंतु राजकारणात ८० ते ९० ओलांडलेले नेतेही मोठ्या प्रमाणात आहेत. या नेत्यांची दुसरी-तिसरी पिढीही राजकारणात असून आपली कुटुंबशाही चालवते आहे. हे करताना कुटुंबशाहीमागचा मुख्य विचार म्हणजे सत्ता ही जातीबाहेर जाऊ नये आणि कुटुंबाबाहेरही जाऊ नये. कुटुंबशाहीला कोणताही पक्ष अपवाद नाही. सगळ्याच पक्षांमध्ये विद्यमान आमदार असताना आपल्याला तिकिट मिळत नसेल तर दुसऱ्या पक्षात जाण्याची इच्छुकांची प्रवृत्ती वाढली आहे. आता ही प्रवृत्तीच लोकशाहीच्या मुळावर उठलेली दिसते. अमुक पक्षात घराणेशाही आहे, कुटुंबशाही आहे असे एकमेकावर आरोप-प्रत्यारोप केले जातात. पण ही 'शाही' आटोक्यात आणण्याचा, संपवण्याचा प्रयत्न कोणीच करताना दिसत नाही. आता हे काम मतदारांनाच करावे लागेल.

सध्या महाराष्ट्र दिल्लीपुढे झुकत चालला आहे अशी चर्चा आहे. त्याचे कारण म्हणजे महाराष्ट्राच्या उमेदवारांची यादी दिल्लीत अंतिम होते असे गत काही दिवसांत दिसून आले आहे. राज्यात महाविकास आघाडी आणि महायुतीच्या नेत्यांनी कितीही बैठका घेतल्या तरी दिल्लीतून अंतिम मंजुरी घ्यावी लागते. महायुतीची यादी अंतिम करावी यासाठी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांनी दिल्लीच्या किती वाऱ्या केल्या याची गणना नाही. काँग्रेसची यादीही दिल्लीत बैठक झाल्यावरच निश्चित झाली. इतके सारे करूनही मविआ आणि महायुतीचे काही उमेदवार अजूनही जाहीर व्हायचेच आहेत. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख तीन दिवसांवर आली असली तरी अंतिम जागावाटप अजून झालेले नाही.

# शेतकऱ्यांना शेतमाल व्यवस्थापन प्रशिक्षीत करण्याची आवश्यकता-कुलगुरू डॉ. इन्द्र मणि

## भाजीपाला विक्रीतून शेतकऱ्यास ३५ टक्केच हिस्सा मिळता, बाकी व्यापाऱ्यांना लाभ

**परभणी । प्रतिनिधी**

**शेती व शेतकरी विकासाकरिता शासन, विद्यापीठ, विविध संस्था यांनी एकत्रित कार्य करण्याची आवश्यकता आहे. शेतकरी बांधवाकरिता आपणास कार्य करण्याची संधी मिळाली आहे. कृषि तंत्रज्ञानाच्या आधारे शेतकरी विविध पिकांचे अधिकाधिक उत्पादन घेत आहेत. आज शेतकरी जो भाजीपाल उत्पादीत करतो त्याच्या विक्रीतील केवळ ३०-३५ टक्केचा हिस्सा शेतकरी बांधवाला मिळतो, बाकी व्यापारांना लाभ होतो. शेतकरी बांधवांना शेतमालाचे दर्जेदार शेतमाल निर्मिती, व्यवस्थापन आणि मार्केटिंग यावर प्रशिक्षित करण्याची आवश्यकता आहे. याकरिता प्रयत्न करण्यात यावेत. परळी तालुक्यात विद्यापीठाची नवीन कृषी व कृषी व्यवसाय व्यवस्थापन महाविद्यालये व एक संशोधन केंद्र स्थापन झाले. या माध्यमातून आपण अधिक प्रभावीपणे कार्य करू शकतो, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. इन्द्र मणि यांनी केले.**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या माध्यमातून परळी तालुक्यातील ४२०० गावांत विविध कृषी विषयक उपक्रम राबविण्यात येत आहेत. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ त्यास तांत्रिक पाठबळ पुरवित आहे. गेल्या वर्षी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ आणि ग्लोबल विकास ट्रस्ट यांच्यात याकरिता सामंजस्य करार झाला. वर्षभरात विद्यापीठाच्या तज्ज्ञांनी विविध विषयावर मार्गदर्शन केले. दि. २६ ऑक्टोबर रोजी कुलगुरू डॉ इन्द्र मणि यांच्या अध्यक्षेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, संशोधन संचालक डॉ. खिजर बेग, विस्तार शिक्षण संचालक डॉ भगवान आसेवार, ट्रस्टी संजय परमार, श्रीमती गांधी, डॉ. गजेंद्र लोंढे, डॉ. व्ही. एस. खंदारे, डॉ. हिराकांत काळपांडे आदीसह विद्यापीठातील शास्त्रज्ञ व ग्लोबल विकास ट्रस्टचे कर्मचारी उपस्थित होते. ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी ट्रस्टव्दारे राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती देताना म्हणाले की, ट्रस्टचे कार्य परळी भागातील ४२०० गांवापर्यंत पोहचले असून शेतकरी बाधंवाचा आर्थिक प्रगती झाली आहे. या कार्याची व्याप्ती वाढविण्याकरिता प्रयत्न करण्यात येत आहे. ट्रस्टच्या माध्यमातून शेतकरी प्रशिक्षणाकरिता जागतिक दर्जाचे प्रशिक्षण केंद्र उभारण्यात आले आहे. वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कृषि विषयक तांत्रिक पाठबळ भेटत आहे. जास्तीत जास्त फळपिकांची वृक्ष लागवड, शेतीत रासायनिक घटकांचा कमी वापर, हवामान बदलास अनुकूल तंत्रज्ञान आदी बाबींवर भर देण्यात येत आहे असे सांगितले. प्रास्ताविक डॉ. हिराकांत काळपांडे यांनी केले. बैठकीत विद्यापीठ व ट्रस्टच्या माध्यमातुन शेतकरी विकास करिता राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचा आढावा घेण्यात आला. पुढील कार्याची दिशा ठरविण्यात आली.

# अग्नीशस्त्रे बाळगणारा आरोपी जेरबंद

## स्थानिक गुन्हे शाखाची कारवाई

**जालना । प्रतिनिधी**

**अवैध अगिशस्त्र बाळगणात्या इसमांची माहिती घेवुन कारवाई करणेबाबत मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बन्सल यांनी स्थानिक गुन्हे शाखा जालना चे पो.नि.श्री. पंकज जाधव व पथकास सूचना दिल्या होत्या. पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव यांनी पथक तयार करुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले होते.**

याची तात्काळ दखल घेऊन २६ ऑक्टोंबर रोजी अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमाबाबत माहिती घेत असतांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, गजानन बाळु राठोड, वय-२५ वर्ष, रा.रुई श्रीराम तांडा, ता. अंबड जि.जालना हा अवैधरित्या भरमार (अगिशस्त्र) बाळगुन आहे. त्यानुसार गजानन राठोड याचा शोध घेत असतांना तो त्याच्या श्रीराम तांडा, अंबड जि. जालना येथे मिळून आल्याने त्यास ताब्यात घेवुन त्याकडे तो बाळगुन असलेल्या भरमार (अगिशस्त्र) बाबत चौकशी केली असता त्याने भरमार (अगिशस्त्र) काढून दिल्याने पोस्टे तीर्थपुरी, जालना येथे भारतीय हत्यार कायदाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक श्री. अजयकुमार बन्सल, अपर पोलीस अधीक्षक , मा. उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल खांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि/श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. साजिद अहमद, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ, पोलीस अंमलदार लक्ष्मीकांत आडेप, सागर बाविस्कर, देविदास भोजने, आक्रूर धांडगे, भागवत खरात, कैलास चेके, नारायण माळी यांनी केली आहे.

# पत्रकार सचिन पवार यांना राष्ट्रीय कर्मयोगी अवार्ड जाहीर!

## दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक कडून पुरस्कार जाहीर

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पत्रकारी क्षेत्रामध्ये आपल्या लेखणीतून सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, राजकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पत्रकार सचिन पवार यांना दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक यांच्याकडून दरवर्षी दिला जाणारा राष्ट्रीय कर्मयोगी अवार्ड जाहीर करण्यात आला आहे. पत्रकार दिनानिमित्त या पुरस्काराचे नाशिक येथे वितरण होणार आहे. पत्रकार सचिन पवार यांना पुरस्कार जाहीर होतात सर्व क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.**

दरवर्षी दर्पण कारभार शास्त्री जांभेकर पत्रकार संस्था नाशिक यांच्याकडून सर्व क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य करणाऱ्या सन्मानित व्यक्तींचा गुणगौरव सोहळा आयोजित केला जातो यावर्षी देखील पत्रकार दिनानिमित्त ५ जानेवारी २०२५ रोजी रोटरी क्लब हॉल गंजमाळ नाशिक येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून यामध्ये सर्व क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांना राष्ट्रीय कर्मयोगी अवॉर्ड जाहीर केले असून यामध्ये पाटोदा तालुक्यातील पत्रकार सचिन पवार यांना हा पुरस्कार पत्रकारिता क्षेत्रातील मिळाला असून त्यांचं निवड पत्र देऊन कार्यक्रमासाठी आमंत्रित केले आहे. पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्वच क्षेत्रातून पत्रकार सचिन पवार यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

**सन्मान लेखणीचा!**

पत्रकार सचिन पवार यांनी आपल्या लेखणीच्या जोरावर स्वतःची वेगळीच ओळख निर्माण केली आहे. धार्मिक सामाजिक राजकीय शैक्षणिक क्षेत्रातील तसेच शोध पत्रकारितेच्या माध्यमातून त्यांनी समाजावर टाकलेला वेगळा प्रभाव हा सामाजिक संस्थांना देखील त्यांच्या कार्याची दखल घेण्यास भाग पाडत आहे. आज पर्यंत केलेली पत्रकारिता ही उल्लेखनीय असून याचमुळे त्यांना आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले असून मराठी पत्रकार परिषद अंबाजोगाई कडून त्यांना सन्मानित करण्यात आले होते त्याचबरोबर शिवछत्रपती पुरस्काराने देखील त्यांचा सन्मान झाला आहे तर आज राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार मिळाल्याने त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# अजित पवार यांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या प्रचाराचा शुभारंभ

## कल्याणकारी योजनांची माहिती असलेल्या एलईडी व्हॅनला दाखवला राष्ट्रवादीचा झेंडा

**मुंबई । प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते एलईडी व्हॅनला राष्ट्रवादीचा झेंडा दाखवून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराची सुरुवात केल्याची माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी माध्यमांना दिली. ज्या ज्या विधानसभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार लढणार आहेत त्या प्रचाराच्या मोहिमेची सुरुवात शनिवारी प्रदेश कार्यालयातून करण्यात आली.**

पुढे बोलताना सुनिल तटकरे म्हणाले की, या एलईडी व्हॅनच्या माध्यमातून महायुती सरकारने केलेल्या लोककल्याणकारी योजना लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून अडीच कोटी महिलांना दिलेला लाभ, शेतकऱ्यांना शेतीसाठी दिलेली वीज माफी, मोफत तीन गॅस सिलेंडरची योजना, मुलींच्या शिक्षणाचा शंभर टक्के खर्च उचलण्याचा क्रांतीकारी निर्णय अशा अनेक योजनांच्या माध्यमातून मतदारापर्यंत पोचवण्याचा आमचा सर्वांचा प्रयत्न असल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजित पवार, प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे, पक्षाचे कोषाध्यक्ष आमदार शिवाजीराव गर्जे, प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदूराव, प्रदेश प्रवक्ते संजय तटकरे, मुंबई बँकेचे उपाध्यक्ष सिध्दार्थ कांबळे, प्रदेश सरचिटणीस संतोष धुवाळी, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्ष महेंद्र पानसरे, विद्यार्थी प्रदेशाध्यक्ष प्रशांत कदम, आदींसह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# पान १ वरून...

### मनोज जरांगे-उदय

यांनी सांगितले होते. यानंतर उदय सामंत यांनी जरांगे पाटील यांची भेट घेतल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. दरम्यान, या भेटीबाबत उदय सामंत यांनी प्रतिक्रिया दिली आहे. आमच्या भेटीत कोणतीही राजकीय चर्चा झालेली नाही, असे उदय सामंत यांनी सांगितले. मी माझ्या काही सहकाऱ्यांचे एबी फॉर्म पक्षामार्फत घेऊन आलो होतो. यादरम्यान, मी मनोज जरांगे पाटील यांना विचारले त्यांना वेळ आहे का, ते दिवसभर कामात व्यस्त असतात. मला समजले की ते कामातून थोडे मोकळे झाले आहेत, त्यामुळे एक मित्र म्हणून मी त्यांना भेटावे, बोलावे या उद्देशाने आलो होतो, असे सामंत म्हणाले.

---

### माजलगावातून जयसिंह

परळीत काही तरी वेगळे करायचे असल्याचे म्हटले जात आहे. रमेश आडसकर यांनी दोन दिवसापुर्वीच माजलगावची तुतारी हाती घेण्यासाठी पवारांच्या पक्षात प्रवेश केला मात्र पवारांना आडसकरांच्या हाती तुतारी ही परळीत द्यायची असल्याचे बोलले जात आहे. तसे झाले तर धनंजय मुंडे विरुद्ध रमेश आडसकर याचा सामना रंगणार आहे. माजलगाव मतदार संघात तुतारी हाती घेण्यासाठी मोहन जगताप, रमेश आडसकर यांच्यासह काही जण इच्छुक असून आडसकरांनी तर त्यासाठीच पवारांच्या पक्षात प्रवेश केला आहे. मात्र पवारांच्या मनात काही तरी वेगळे असल्याचे दिसत आहे. पक्षाच्या दुसऱ्या यादीतही माजलगाव आणि परळीच्या उमेदवाराची घोषणा केली नाही. त्यामुळे पवार या दोन मतदार संघात काही तरी वेगळा डाव टाकणार असल्याचे दिसते. माजलगावात प्रकाश सोळंके यांचे पुतणे जयसिंह सोळंके यांना प्रकाश दादांच्या चक्रव्युहातून बाहेर काढून त्यांना उमेदवारी देण्यासाठी हालचाली सुरु असल्याची जोरदार चर्चा आहे. तसे झाले तर माजलगावात काका विरुध्द पुतण्या अशी लढाई होईल.

---

### परळीत अल्ट्राटेक सिमेंट कंपनी

या उद्योगामुळे अल्ट्राटेक या जागतिक दर्जाच्या कंपनीचे अतिरिक्त युनिट परळीत उभा राहणार असून त्याद्वारे मोठ्या प्रमाणात स्थानिकांना रोजगार निर्मिती होणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. निवडणुकीची आचारसंहिता लागण्यापूर्वी कंपनीच्या वरिष्ठ अधिकारी यांचे शिष्टमंडळ परळी येथे धनंजय मुंडे यांच्या भेटीला आले होते, यावेळी झालेल्या बैठकीमध्ये सकारात्मक चर्चा झाली असून, कंपनीने क्षमता वाढीसाठी दि.२४ रोजी संपन्न झालेली पर्यावरण जनसुनावणी पार पडल्यानंतर परळी येथील युनिट साठी दोन टप्प्यांत अतिरिक्त ६०० कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यास मान्यता दिली असल्याचे कंपनीच्या वतीने कळविण्यात आले आहे. या आधी देखील धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून परळी वैजनाथ शहरालगत इंडिया सिमेंट कंपनीने सदरील युनिट सुरू केले होते. त्याद्वारे देखील मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झालेली आहे. त्यानंतर आता जागतिक दर्जा प्राप्त असलेली अल्ट्राटेक सिमेंट कंपनीच्या या मोठ्या गुंतवणुकीमुळे मोठ्या प्रमाणात विविध इतर पूरक उद्योगांना चालना मिळणार असून स्थानिकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती देखील होणार आहे. या गुंतवणुकीसाठी मान्यता दिल्याबद्दल धनंजय मुंडे यांनी अल्ट्राटेक कंपनीच्या संचालक मंडळाचे आभार मानले आहेत.

---

### आण्णांना विजय करण्यासाठी कार्यकर्त्यांनी

राशन मिळावे म्हणून प्रशासकीयस्तरावर सातत्याने प्रयत्न करत राशन वितरण व्यवस्था सुरळीत करून आज मतदारसंघातील प्रत्येक कार्ड धारकांना हाक्काचे राशन मिळत आहे त्यामुळे जनतेने पुन्हा आग्रह करत आ.लक्ष्मण आण्णांना विधानसभा निवडणुकीत उभा केले आहे तरी आण्णांना निवडून आण्ण्यासाठी सर्व कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी बैठकी दरम्यान बोलतांना केले आहे . विधानसभा निवडणुकीच्या पाश्वभूमीवर आ.लक्ष्मण पवार यांच्या प्रचारासाठी तसेच निवडणूक जिंकण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या संपर्क कार्यालयात युवानेते शिवराज पवार यांच्या उपस्थितीत आज २६ रोजी सकाळी नियोजन बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळी आ.लक्ष्मण पवार यांनी मतदारसंघात दहा वर्षांत केलेले काम जनतेत पर्यंत गेले पाहिजे यासाठी प्रत्येकांनी गावागावात चर्चा करून भविष्यातील उर्वरित विकास काम करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या विजयासाठी कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बैठकी दरम्यान केले आहे . यावेळी दादासाहेब गिरी,मधुकर वादे,ब्रम्हदेव धुरंधरे,संजय इगळे,कानगुडे आप्पासाहेब, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, विठ्ठल मोटे,मुन्ना शेठ, जुनेद बागवान, अनिल आप्पा शेट्टे, रशीद बागवान, सचिन वावरे,बद्दोदिन, पिटु साळवे, लक्ष्मण खरात, बाबा खरात, दशरथ पंडीत, करण जाधव, आदी उपस्थित होते . मतदारसंघात गेली काही दिवसा पासुन आ.लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नाही अशी घोषणा केली त्यानंतर मतदार संघातील जनते मोठ्या प्रमाणात चल बीचल निर्माण झाली तर अनेक कार्यक्रते पदाधिकारी यांनी उपोषणांचा निर्णय घेतला होता . त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांनी बैठक घेऊन सर्वाशी संवाद साधत आपली भुमीका व्यक्त केली होती त्यावर सर्वांनीच आण्णा तुम्ही निवडणूक लढवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली सर्वाच्या मताने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढणार असल्यांचे जाहीर केला त्यामुळे मतदारसंघातील जनतेसह कार्यक्रत्यांनी निर्णयांचे स्वागत केले आहे.

---

### युवासेनेच्या बीड जिल्हाप्रमुखपदी

जवळचे व विश्वासू निकटवर्तीय असल्याचे समजते या निवडीचे जिल्हाभरात कौतुक करण्यात येत आहे तसेच या निवडीमुळे जिल्हाभरातील युवासैनिकांत नवचैतन्य संचारले आहे.

युवासेनेच्या स्थापनेपासून अभिषेक दिवे हे युवासेनेत निष्ठेने काम करत होते. शिक्षण, आरोग्य, रोजगार या युवासेनेच्या त्रिसुत्रीप्रमाणे त्यांची राजकीय वाटचाल राहिलेली आहे. शालेय विद्यार्थ्यांच्या फीसवाढी विरोधात त्यांनी आंदोलने केलेले आहेत. विद्यार्थ्यांसाठी त्यांनी मदत कक्ष उभारला होता. युवासेनेच्या आंदोलनात त्यांचा नेहमीच सहभाग असतो. अभिषेक दिवे हे शिवसेना, युवासेना व ठाकरे परिवाराशी कायम एकनिष्ठ राहिलेले आहेत त्यामुळे त्यांना एकनिष्ठतेचे फळ म्हणुन मातोश्रीने युवासेना जिल्हाप्रमुख या पदाची माळ गळ्यात टाकली आहे. अभिषेक दिवे या पदाला नक्कीच न्याय देतील असा विश्वास जनतेच्या मनात आहे. युवासेनेची बीड जिल्ह्यात मोठी बांधणी करुन युवासेनेचे जाळे ते विणतील व अनेक तरुणांना युवासेनेत दाखल करतील अशी चर्चा बीडमध्ये रंगताना दिसत आहे. येत्या स्थानिक संस्थाच्या निवडणुकीत शिवसेनेच्या खांद्याला खांदा लावुन काम करणारी युवासैनिकांची फौज या निवडीमुळे बघायला मिळेल यात तिळमात्र शंका नाही.

---

### पंकजा मुंडे, अशोक चव्हाणा

शिवराज सिंह चौहान, आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा आणि उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ सिंह यांचीही नावे भाजपच्या स्टार यादीमध्ये आहेत. यामध्ये प्रमोद सावंत, भूपेंद्र पटेल, विष्णुदेव साई, मोहन यादव, भजनलाल शर्मा, नायबसिंग सैनी, देवेंद्र फडणवीस, चंद्रशेखर बावनकुळे, शिव प्रकाश, भूपेंद्र यादव, अश्विनी वैष्णव, नारायण राणे, पियुष गोयल, ज्योतिरादित्य शिंदे, अशोक शिंदे, ज्योतिरादित्य पाटील, दानवे पाटील यांचा समावेश आहे. अशोक चव्हाण, उदयनराजे भोसले, विनोद तावडे, आशिष शेलार, पंकजा मुंडे, चंद्रकांतदादा पाटील, सुधीर मुनगटीवार, राधाकृष्ण विखे पाटील, गिरीश महाजन, रवींद्र चव्हाण, स्मृती इराणी, प्रवीण दरेकर, अमर साबळे, मुरलीधर मोहोळ, आशीष शेलार, नवनीत राणा इत्यादी नावांचा समावेश आहे.

---

### क्षीरसागरांचा संदिपच बीडमध्ये

आणि उमेदवारी मिळाल्यावर ते निवडूणही आले. मात्र त्यांच्या या विजयात संदिप क्षीरसागरांचा सिंहाचा वाटा होता, हे संपुर्ण राज्याला माहित आहे. विधानसभा निवडणुक लागताच संदिप यांचा पत्ता कट करण्यासाठी त्यांच्याच पक्षातील नेते कामाला लागले. खा. बजरंग सोनवणे यांचाच त्यांना विरोध असल्याची सुध्दा चर्चा होती. पत्रकार भागवत तावरे, बी.बी. जाधव, राजेंद्र मस्के, ज्योतीताई मेटे यांच्या नंतर माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या सुध्दा नावाची चर्चा झाली. संदिप क्षीरसागर सुध्दा या दरम्यान टेंशनमध्ये असल्याचे दिसत होते. लोकसभा निवडणुकीत निष्ठेने पक्षाचे काम करुन उमेदवार निवडून आणला तरी सुध्दा उमेदवारी मिळू नये यासाठी कटकारस्थान होत असल्याने ते कदाचित निराश सुध्दा झाले असतील. शेवटी त्यांना निष्ठेचे फळ मिळाले असून शरद पवार गटाच्या दुसऱ्या यादीत बीडमधून संदिप भैय्यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे पवारांच्या बीड राष्ट्रवादीत संदिप भैय्याच पावरफुल्ल असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.

---

### रामकृष्ण बांगर

संस्थांमध्ये कोट्यावधी रुपयांचा घोटाळा केला. बीड जिल्ह्यात महात्मा फुले अर्बन बँकेच्या माध्यमातून १४ कोटी रुपयांच्या घोटाळ्यांचा गुन्हा त्यांच्यासह ४१ जणांवर दाखल झाला होता. गेल्या ३० ते ४० वर्षापासून अनभिषिक्त सम्राट बनलेल्या रामकृष्ण बांगर यांचे कुटुंब फरार झाले होते. रामकृष्ण बांगर यांच्यावर कलम ४२०, ४०९, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) अन्वये गुन्हा दाखल आहे. त्यांच्या पत्नी सत्यभामा बांगर यांना ८ ऑक्टोबर रोजी घरातून पकडले होते. दरम्यान या प्रकरणी पाटोदा पोलीस अधिक तपास करीत आहेत. ऐन विधानसभा निवडणुकीदरम्यान ही कारवाई झालेला राजकीय वर्तुळात खळबळ माजली आहे. सन २०११ ते २०१५ कालावधी दरम्यान महात्मा फुले अर्बन बँकेमध्ये १३ कोटींचा बनावट दस्तावेज सात करून सत्यभामा बांगर यांनी अपहार केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. रामकृष्ण बांगर यांनी देखील पाटोदा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती असताना बाजार समितीची जमीन बळकावल्याचा आरोप आहे. या प्रकरणात देखील गुन्हा नोंद झाला होता. आता त्यांच्या पत्नी बँकेच्या अपहार प्रकरणात अडचणीत आल्यानंतर अविनाश बांगर यांनाही अटक करण्यात आलीय. दरम्यान, सत्यभामा बांगर यांनी कोणतीही कागदपत्रं न घेता, तारण न घेता बनावट कागदपत्रं तयार करून ते खर असल्याचं भासवून १३ कोटी रुपयांचे कर्ज उचलले होते. या प्रकरणात बांगर कुटुंबीयांच्या अडचणीत वाढ झाली असून पोलिसांनी सत्यभामा यांनाही अटक केली होती.

---

### भाजप जिल्हाध्यक्षपदी शंकर देशमुख

जोरदार टीका होत होती. शेवटी त्यांनी पदाचा राजीनामा देऊन शरद पवार गटामध्ये प्रवेश केला. त्यानंतर जिल्हाध्यक्षपदी कोणाची वर्णी लागणार याविषयी चर्चा सुरू झाली. सर्जेराव तांदळे, नवनाथ शिराळे, जगदीश गुरखुदे यांची नावे चर्चेत होती. शेवटी शंकर देशमुख यांची भाजपच्या जिल्हा अध्यक्षपदी वर्णी लागली आहे.

---

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि.२७ ऑक्टोबर २०२४


## नांदेडमध्ये नवोदित अर्चरी खेळाडूसाठी सात दिवशीय भव्य मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड शहर, जिल्हा तसेच लगतच्या जिल्ह्यातील नवोदित खेळाडूना कळविण्यात अत्यंत आनंद होत आहे की, नांदेड शहरात पहिल्यांदाच भव्य अशा सात दिवशीय मोफत अनिवासी अर्चरी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन मुख्य प्रशिक्षक तथा आंतरराष्ट्रीय खेळाडू व पहिले एनआयएस कोच श्री. अमोल बोरीवाले सर यांच्या पुढाकारात व मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे. सदरील शिबिरात अर्चरीचे बेसिक ज्ञान तसेच आवश्यक इत्यंभूत बाबीची सखोल माहिती दिली जाणार आहे.अर्चरी मधील इंडियन, कंपाऊंड, रिकर्व्ह प्रकारातील खेळाडूची आवड व त्याच्या अंगी असलेले कौशल्य तपासून त्यांना मार्गदर्शन केले जाणार आहे.अर्चरी खेळाची आवड असूनही अनेकांना केवळ माहिती अभावी या खेळापासून दूर रहावे लागत होते. नांदेडच्या इतिहासातील पहिलेच महत्वपूर्ण असे शिबिर नांदेड शहरातील मालेगाव रोडवरील हॉटेल पद्मावती ग्रँड समोरील इंडियन डिफेन्स अकॅडमी येथे अर्चरी मैदानावर दि.५ ते ११ नोव्हेंबर २०२४ दरम्यान करण्यात आलेले आहे. त्यामुळें नांदेड शहर, जिल्हा तसेच लगतच्या जिल्ह्यातील नवोदित खेळाडू व त्यांच्या पालकांनी या भव्य अशा मोफत अर्चरी शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन अर्चरीचे आंतरराष्ट्रीय खेळाडू,तथा मुख्य कोच श्री.अमोल बोरीवाले सर यांनी केले आहे.अधिक माहिती व नाव नोंदणीकरिता श्री उद्धव जगताप सर-मो. ९७६७९७२८६६,श्री सुधाकर राठोड सर-मो. ९९२१५२९४२८ श्री.ज्ञानोबा नागरगोजे सर-मो.९८९०४४२७०४ ,श्री किशोर नरवाडे सर-मो. ९५६१७८८३८७, श्री दिपक कदम सर-मो. ९०२१५७६६९९, श्री प्रेम जाधव सर-मो.९३५९५५७३२९ यांच्याशी संपर्क साधावा.

# पुणे येथे इंडियन मेडिकल असोसिएशनचा कलादर्पण २०२४ राज्यस्तरीय सांस्कृतिक सोहळा उत्साहात व जल्लोषात साजरा

## सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांची माहिती

अंबाजोगाई । प्रतिनिधी

इंडियन मेडिकल असोसिएशन महाराष्ट्र राज्याच्या वतीने घेण्यात आलेल्या विविध राज्यस्तरीय स्पर्धांचे पारितोषिक वितरण व गुणदर्शन कार्यक्रम नुकताच पुणे येथे संपन्न झाल्याची माहिती सांस्कृतिक समितीचे अध्यक्ष तथा अंबाजोगाई येथील सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले यांनी दिली.

या कार्यक्रमास संघटनेचे प्रदेश अध्यक्ष डॉ.दिनेश ठाकरे,नियोजित अध्यक्ष डॉ संतोष कदम ,सचिव डॉ सौरभ संजनवाला,कोषाध्यक्ष डॉ विक्रांत देसाई, इंडियन मेडिकल असोसिएशनचे पुणे शाखेचे अध्यक्ष डॉ.रंजन संचेती, डॉ.राजेश इंगोले अध्यक्ष, सांस्कृतिक समिती महाराष्ट्र राज्य, डॉ संजय पाटील,डॉ नवरंगे, सचिव डॉ वीरेंद्र ओस्टवाल, उपाध्यक्ष डॉ.वैजयंती पटवर्धन, सहसचिव डॉ मीनाक्षी कुलकर्णी, डॉ संतोष कुलकर्णी, डॉ गीतांजली शर्मा,डॉ तुकाराम मुंढे, डॉ मोहिनी गानू, डॉ वृंदा कुलकर्णी, डॉ राजेश्री सावंत, डॉ पल्लवी दोडके, डॉ प्रज्ञा किनगावकर , डॉ राजन जोशी ,डॉ माया भालेराव यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. सौरभ संजनवाला, डॉ.राजेश इंगोले,डॉ संतोष कदम, डॉ.संजय पाटील,डॉ वैजयंती पटवर्धन, डॉ मीनाक्षी कुलकर्णी, डॉ.संतोष कुलकर्णी यांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलन करून करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना आयएमएचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी आय एम ए महाराष्ट्र तर्फे सलग दुसऱ्या वर्षी कलादर्पण २०२४ हा कलाउत्सव महाराष्ट्रातील सर्व डॉक्टर्स साठी आयोजित केला आणि व्यस्त असणाऱ्या डॉक्टर्सनी या महोत्सवात प्रचंड संख्येने सहभागी होऊन याचा आनंद घेतला. महाराष्ट्रातील डॉक्टर्ससाठी या सांस्कृतिक स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. आपल्या दैनंदिन धकाधकीच्या जीवनात ताणतणाव विसरून इतक्या प्रचंड संख्येने डॉक्टर्स सहभागी झाले हेच या आयोजित कार्यक्रमाचे फलीत आणि यश असल्याचे सांगितले. कला ही माणसाच्या जगण्यात

उतरली पाहिजे आणि जीवनातील ताणतणाव कमी करण्यासाठी प्रत्येकाने एखादी कला जोपासली पाहिजे असे मत व्यक्त केले. तर संघटनेचे राज्याचे सचिव डॉ.सौरभ संजनवाला यांनी इंडीयन मेडीकल असोसिएशन सांस्कृतिक समिती तर्फे आयोजित या गायन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, छायाचित्र स्पर्धा, नृत्यस्पर्धा,रिल्स स्पर्धा , काव्य लेखन स्पर्धा इतक्या मोठ्या प्रमाणात यशस्वी केल्याबद्दल सांस्कृतिक समितीचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांचे अभिनंदन करीत डॉ.राजेश इंगोले यांनी या पुढील काळात सुद्धा अशा बहारदार कार्यक्रमांचे आयोजन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावर्षी घेण्यात आलेल्या या स्पर्धा न भूतो न भविष्यती अशा प्रकारे आयोजित करण्यात आल्या आहेत असे गौरवोद्गार काढत आयएमए ही संघटना खऱ्या अर्थाने डॉक्टर्सच्या सुखदुःखात सदैव सहभागी असते असे प्रतिपादन केले. पुणे स्थानिक शाखेचे अध्यक्ष डॉ राजन संचेती यांनी डॉ राजेश इंगोले हे उत्साहाचं अजब रसायन आहे जे कार्य हाती घेतात ते केवळ तडीस नेतात अस नाही तर पूर्ण ताकतीने स्वतःला त्यात झोकून देऊन त्या कार्याला नवीन आयाम देतात. कलादर्पण २०२४ वर्ष दुसरे पुणे येथे आयोजित करण्याचे सौभाग्य पुणे शाखेला मिळाले आहे त्याबद्दल संघटनेचे आभार मानले. डॉ संतोष कदम यांनी डॉक्टर्स हे धरती वरील देव मानले जातात पण, वस्तुस्थितीत डॉक्टर्स ही सर्वसामान्य व्यक्ती असते. दैनंदिन ताणतणाव, प्रश्न, समस्या त्यालाही असतात त्यामुळे त्यांनाही या ताणतणावापासून मुक्ती हवी असते आणि या सांस्कृतिक कार्यक्रमाच्या आयोजनातून आणि समोर उपस्थित डॉक्टर्सची संख्या पाहता डॉ.राजेश इंगोले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी हा हेतू साध्य केल्याचे दिसून येते. उपस्थित डॉक्टर्स आपआपल्या विषयांत तर तज्ज्ञ आहेतच पण, त्यांनी यावेळी ज्या कला सादर केल्या आहेत,त्यामुळे आम्हीही अचंबित झालो असल्याची प्रांजळ कबुली देत डॉक्टर्स ही उत्तम गायक, संगीतकार, फोटोग्राफर, चित्रकार, उत्कृष्ट नर्तक ,कवी कवयित्री ,रिल्स स्टार असू शकतात हे या कलादर्पण २०२४ सांस्कृतिक सोहळ्याने दाखवून दिल्याचे मत व्यक्त केले. यावेळी इंडीयन मेडीकल असोसिएशन तर्फे घेण्यात आलेल्या विविध सांस्कृतिक स्पर्धांचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन सूत्रसंचालन डॉ. गीतांजली शर्मा तर आभार प्रदर्शन डॉ राजन जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतीक समितीच्या सर्व मध्यवर्ती कार्यकारणीने व पुणे स्थानिक शाखेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# निरंकारी मंडळाच्या वतीने भव्य रक्तदान शिबिर

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथे संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन द्वारा संचलित निरंकारी मंडळाच्या वतीने येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात काल दि.२६ ऑक्टोंबर शनिवार रोजी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात रक्ताचा तुटवडा असल्यामुळे येथील ब्लड बँकने आव्हान केल्यानंतर संत निरंकारी मंडळाने रक्तदात्यांकडून रक्तदान करून घेतले.

या रक्तदान शिबाराचे उद्घाटन दिंद्रुड पत्रकार संघाचे अध्यक्ष अमोल ठोंबरे, पत्रकार नागेश वकरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्राथमिक आरोग्य

### प्राथमिक आरोग्य केंद्रात ६६ रक्तदात्यांनी केले रक्तदान

केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. निलेश ढाकणे, डॉ. शेख, ग्रा.पं. सदस्य नारायण चांदबोधले, शंकर यादव, अंबाजोगाई ब्लड बँक टीम, ग्रामस्थ, आदि उपस्थित होते. या शिबिराला योगदान देण्यासाठी दिंद्रुड, नागपिंपरी, गुंज, उमरा, सिरसाळा, काडीवडगाव येथील सेवेकर्यांनी योगदान देत एकूण ६६ रक्तदात्यांनी आपले रक्त दान केले.

''रक्त नाल्यात नव्हे तर रक्त नाडीत वहावे'' हे ब्रीदवाक्य घेऊन संत निरंकारी मंडळ प्रतिवर्षी सामाजिक उपक्रम म्हणून रक्तदान शिबिराचे आयोजन करतात. शिबिरात रक्तदात्यांना बिस्किट, चहा व नाश्त्याची व्यवस्था मंडळाच्या वतीने करण्यात आली होती. अंबाजोगाई स्वाराती रुग्णालयातील ब्लड बँकेच्या वतीने डॉ. वैभव देशमुख, डॉ. मधुकर गावीत, अनंत शिताफ, वाल्मीक कांबळे, प्रणव मंत्री, बाळासाहेब यादव आदिंनी रक्त डोनेशन करुन घेतले. रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी दिंद्रुड ब्रांच मुखी शंकर यादव, सेवादल शिक्षक अमर जाधव, शिवहार शिरसे यांच्यासह आदी सेवादलाच्या कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले.

## सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा सुमितकुमार भारस्कर राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत देशात द्वितीय

माजलगाव प्रतिनिधी

मेरठ उत्तरप्रदेश येथे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत १९ वर्षे वयोगटात सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा सुमितकुमार लक्ष्मण भारस्कर हा विद्यार्थी देशात द्वितीय आला असून, रौप्य पदकाचा मानकरी ठरला आहे.सुमितकुमार ने महाराष्ट्राला रौप्य पदक मिळवून दिले आहे गेली अनेक वर्ष सुमितकुमार सातत्याने कुस्तीचा सराव करत आहे. त्याने राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावर यश संपादन केले आहे

या खेळाडुला क्रीडा शिक्षक प्रा.प्रविण कोरडे . प्रा नवनाथ आवारे प्रा. सुखदेव माने. प्रा डॉ. सी. डी. फड यांचे मार्गदर्शन लाभले. सुमितकुमारच्या यशाबद्दल प्राचार्य डॉ. जी. के. सानप, उपप्राचार्य डॉ. एन. के. मुळे, उपप्राचार्य डॉ. एम. ए कव्हळे, प्रा. प्रकाश गवते, प्रा. पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा. अलझेंडे सर, प्रा. टाक ,प्रबंधक प्रशांत चव्हाण, अधीक्षक सतीश एरंडे, प्रा.सुदर्शन स्वामी,एकनाथ मस्के यांनी अभिनंदन केले.

पान ६ वरून...

### लक्ष्मण आण्णांना विजयी

भविष्यातील उर्वरित विकास काम करण्यासाठी आ.लक्ष्मण पवार यांच्या विजयासाठी कार्यक्रत्यांनी कामाला लागावे असे आव्हान शिवराज पवार यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना बैठकी दरम्यान केले आहे

यावेळी दादासाहेब गिरी,मधुकर वादे,ब्रम्हदेव धुरंधरे,संजय इगळे,कानगुडे आप्पासाहेब, धम्मपाल सौदरमल, भरत गायकवाड, विठ्ठल मोटे,मुन्ना शेठ, जुनेद बागवान, अनिल आप्पा शेट्टे, रशीद बागवान, सचिन वावरे,बद्दोदिन, पिटु साळवे, लक्ष्मण खरात, बाबा खरात, दशरथ पंडीत, करण जाधव, आदी उपस्थित होते

मतदारसंघात गेली काही दिवसा पासुन आ.लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवणार नाही अशी घोषणा केली त्यानंतर मतदार संघातील जनते मोठ्या प्रमाणात चल बीचल निर्माण झाली तर अनेक कार्यक्रते पदाधिकारी यांनी उपोषणांचा निर्णय घेतला होता.त्यामुळे आ.लक्ष्मण पवार यांनी बैठक घेऊन सर्वाशी संवाद साधत आपली भुमीका व्यक्त केली होती त्यावर सर्वांनीच आण्णा तुम्ही निवडणूक लढवली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली सर्वाच्या मताने आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणुक लढणार असल्यांचे जाहीर केला त्यामुळे मतदारसंघातील जनतेसह कार्यक्रत्यांनी निर्णयांचे स्वागत केले आहे

### माजलगावमधून भाई

आहे.भाई गंगाभिषण थावरे यांनी अंतरवली सराटी येथे मनोज जरांगे यांची भेट घेऊन माजलगाव मतदारसंघातून उमेदवारी मागितली होती.दरम्यान दि २५ ऑक्टोबर शुक्रवार रोजी भाई थावरे यांनी माजलगाव मतदारसंघातून अपक्ष म्हणून उमेदवारी दाखल केली आहे.

### विकासाच्या मुद्द्यावरच

जनतेला दररोज पाणी पुरवठा व्हावा यासाठी आपण प्रयत्न करणार असून जायकवाडी प्रकल्पाद्वारे सध्या शहराला १५ एमएलडी इतका पाणी पुरवठा होत असून अंबड शहराजवळ असलेल्या जलशुद्धीकरण केंद्रात सुरू असलेले काम पूर्ण झाल्यानंतर आणखी ३५ एमएलडी असे एकूण ५० एमएलडी पाणी शहराला मिळणार असून घानेवाडी ते शहरातील जलशुद्धीकरण केंद्र असे नवीन जलवाहिनीचे काम पूर्ण झाल्यानंतर संत गाडगेबाबा जलाशयातून देखील पाणी पुरवठा शहराला होणार आहे. याशिवाय हातवन येथूनही शहराला पाणीपुरवठा करण्याचा प्रयत्न केला जाईल. हे प्रयत्न यशस्वी झाले तर मुंबई, पुणे, नागपूर नंतर दररोज पाणी पुरवठा करणारे जालना शहर हे राज्यातील चौथे शहर होईल असा विश्वास महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ. कैलास गोरंट्याल यांनी व्यक्त केला. कॉलेजमध्ये जाणारा विद्यार्थी हा प्रवेश घेतल्यापासून परिक्षेपर्यंत अभ्यास करतो. आणि काही विद्यार्थी हे नकला मारून पास होतात. मात्र, मुलाखतीसाठी गेल्यानंतर ज्याने परिक्षेपर्यंत अभ्यास तोच पास होतो. नक्कल करणारा विद्यार्थी पास होत नाही असा टोला आ. कैलास गोरंट्याल यांनी नावं न घेता आपले प्रतिस्पर्धी उमेदवार अर्जुनराव खोतकर यांना लगावला.

# किट्टी आडगाव जि.प.शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेश व शालेय साहित्याचे वाटप

**माजलगाव । प्रतिनिधी**

शासनाकडून जि.प.शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात येत असले तरी या योजनेतून अनेक विद्यार्थ्यांपर्यंत गणवेश पोहचण्यास विलंब होतो ही उणीव लक्षात घेऊन अशा वंचित गरजू विद्यार्थ्यांना रोटरी क्लब ऑफ माजलगाव सेंट्रल व माहेश्वरी महिला मंडळ माजलगाव यांच्या संयुक्त प्रयत्नातून किट्टी आडगाव जि.प.शाळेतील ३५ विदयार्थ्यांना गणवेश वाटप व इतर गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

दि.२५ ऑक्टोबर रोजी जेष्ठ नागरिक दत्तात्रय आगे यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषद शाळा किट्टी आडगाव येथे रोटरी क्लब सेंट्रल चे अध्यक्ष रो. पांडुरंग चांडक व माहेश्वरी महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. माया चांडक सरपंच

रुख्मानंद खेत्रे यांचे हस्ते शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना गणवेशाचे व वही पेन पेन्सिल पुस्तक अशा शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी प्रोजेक्ट चेअरमन रो. सुनील शिंदे व सुदर्शन थावरे सह रोटरी सदस्य रो. अण्णासाहेब तौर रो.इम्रान नाईक रो.इंजि गजेंद्र खोत रो.विनोद जाधव रो.समीर शेख माहेश्वरी महिला मंडळाच्या माहेश्वरी महिला च्या सचिव सरोज तोषनीवाल,सदस्या सविता रांदड,अर्चना कलंत्री अनिता लोहिया आडगाव येथील नागरिक बाबासाहेब आगे शंकराराव आगे पत्रकार पद्माकर देशमुख रामराव आगे मुख्याध्यापक श्री किसन हुलगे व शाळेतील शिक्षक वृंद इत्यादी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन सह शिक्षक विरभद्र स्वामी यांनी केले.

# प्रशिक्षणाला उपस्थित न राहिल्यास कारवाई-वसिमा शेख

**आष्टी । प्रतिनिधी**

सार्वत्रिक विधानसभा निवडणुकीसाठी आष्टी-२३१ विधानसभा मतदारसंघाच्या मतदान केंद्रावर

नियुक्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण झाले.त्यावेळी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी प्रशिक्षणाला उपस्थित न राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारवाईचा इशारा निवडणुक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी दिला आहे.

आष्टी शहरातील मोरेश्वर मंगल कार्यालयामध्ये शनिवार (दि.२६) रोजी प्रशिक्षण कार्यक्रमात निवडणूक निर्णय अधिकारी विमा शेख,सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली पाटील,तहसिलदार दत्तात्रय निलावाड,नायब तहसिलदार बाळदत्त मोरे,नायब तहसिलदार प्रकाश सिरसेवाड,नायब तहसिलदार शिवनाथ खेडकर,गोरख तरटे यांच्यासह आदी उपस्थित होते. यावेळी मतदान कर्तव्यावर नियुक्त केलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना मतदान यंत्राच्या प्रत्यक्ष हाताळणीचे प्रथम प्रशिक्षण देण्यात आले.आष्टीमधील प्रशिक्षणासाठी नेमणूक केलेल्या कर्मचाऱ्यांची एकूण संख्या २३०० इतकी असून,या पैकी आज १,१५० अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात आले.तर उद्या दि.२७ रविवारी ११५० अधिकारी-कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.आज शनिवार दि.२६ रोजी जे कर्मचारी प्रशिक्षणासाठी गैरहजर होते.या गैरहजर कर्मचाऱ्यांवर लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५१चे कलम १३४ नुसार कारवाई करण्याचे सूतोवाच निवडणूक निर्णय अधिकारी वसिमा शेख यांनी केले.सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली पाटील यांनी प्रशिक्षणासाठी जे अधिकारी/कर्मचारी नियुक्त केले आहेत, त्यांनी या प्रशिक्षणाला न चुकता उपस्थित राहण्याच्या सूचना केल्या.

पान ६ वरून...

### पक्षाने काहीच निर्णय घेतला

नेर शेवली या ठिकाणाहून आलेल्या कार्यकर्त्यांनी आपले मत व्यक्त केली यावेळी अनेकांना अश्रू अनावर झाले.

आम्ही परतूरला राहतो, हमे खाणाऱ्याला पाडायचे लक्षात ठेवा युवा नेते नितीन जेथलिया.

परतुर येथे भव्य पदयात्रेनंतर बैठकीत बोलताना युवा नेते नितीन जेथलिया म्हणाली की प्रत्येक वेळी आम्हाला संघर्ष करावा लागला. आम्ही परतुला राहतो जालना औरंगाबाद पुणे मुंबईला राहत नाही या ठिकाणी राहून नवरात्र जयंतीची कामे करतो तरीही पक्षाकडून आम्हाला त्रास होतो व आज उमेदवारी ही नाकारली त्यामुळे या निवडणुकीला कार्यकर्त्यांच्या बळावर अपक्ष सामोरे जाऊ. आम्ही धार्मिक व चारित्र्यसंपन्न आहोत जनता आम्हाला करणार नाही आम्हाला विकत घेणाऱ्याची लायकी नाही या निवडणुकीत हफ्ते खाणाऱ्या माणसाला पाडायचं आहे. पक्षाने आपल्यावर अन्याय केला आहे आपल्याच पक्षातील काही काँग्रेस संपवायला निघाले आहेत मात्र काँग्रेस संपणार नाही आम्हाला विकत घेणाऱ्याची लायकी नाही असे सांगून आमदार बबनराव लोणीकर यांच्यावर नितीन जेथलिया यांनी सडकून टीका केली. यावेळी बैठकीस मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### सुरेश धसांचा दुसरा राजकीय

टाकला आहे. पेच कायम असून काहीच सुचत नसल्याने त्यांनी फेसबुक पोस्ट करत पक्ष नेतृत्वाने परवानगी दिली तर दुसऱ्या उमेवाराचा प्रचार करीन या आशयाची पोस्ट केली आहे. यामुळे महायुतीमध्ये टोकाचा वाद सुरू असल्याचे दिसून येत आहे. तर उमेदवारी मिळालीच नाही आणि त्यांनी अपक्ष निवडणूक नाही लढविली तर ते दुसऱ्याचा प्रचार म्हणजे नेमका कोणाचा प्रचार करतील याबाबतही जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पण या जागेचा पेच महायुती कसा सोडविणार याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### मनोज दादा जरांगे

गणगेवाडी, बेलगाव, शेकापूर ,चिंचाळा, व राघापूर अशा अनेक गावांमध्ये पंचवीस किलोमीटर रस्त्याचे काम अडचण पाहून स्वखर्चाने करून दिले. जनावरांमधील लंपी आजाराने २०२३ यावर्षी थैमान घातले होते. त्या काळामध्ये १७००० जनावरांना मोफत लसीकरण करून दिले. मराठा आरक्षणासाठी आपल्या गावामध्ये सात दिवस पाणी व अन्नत्याग आंदोलन केले. गावामध्ये सरकारची अंत्ययात्रा काढली. आष्टी शहरातील जरांगे पाटील यांच्या सभेपूर्वी ४२ गावांमध्ये सायकलवर प्रवास करून सभेचे निमंत्रण पोहोच केले. ज्या गावात रात्र होईल तेथेच मुक्कामही केला आहे.

आंतरवली सराटी येथील आपल्या सभेसाठी आष्टी ते आंतरवाली असा १८० किलोमीटरचा चार दिवस प्रवास करून वाटेवरील गावांमध्ये जनजागृती केली.तसेच

बीड येथील शांतता रॅलीमध्ये लोकांनी लाखोच्या संख्येने उपस्थित राहावे म्हणून आष्टी पाटोदा शिरूर या तीन तालुक्यातील गावांमध्ये आरक्षणवादी कार्यकर्त्यांबरोबर निमंत्रण देण्याचे काम केले. कुस्तीच्या तालमीमध्ये सराव करणाऱ्या कुस्तीगीरांना व गोरगरीब रुग्णांना वेळोवेळी यथाशक्ती आर्थिक सहकार्य केले होते. मराठा आरक्षण आंदोलनाच्या वेळी आंतरवली सराटी मध्ये माता माऊली यांच्यावरती जेव्हा लाठी चार्ज झाला तेव्हापासून राजकीय पक्षाशी फारकत घेतली. आज पर्यंत जरांगे पाटील यांच्या सर्वच भूमिकाशी एकनिष्ठ आहे.

प्रत्येक व्यक्तीच्या सुखा दुःखामध्ये सामील हो ना आधार देण्याचे काम नेहमीच करतात

आष्टी,पाटोदा,शिरूर तालुक्याची पिंपळवंडी येथील घोंगडी बैठकीवेळी तालुक्यातील ६९ गावांमध्ये सायकल वरती जाऊन निमंत्रण दिले.व जनजागृती करत घोंगडी बैठकीला हजर राहिलो. २२/९/२०२४ धामणगाव ता,आष्टी येथील मारूती मंदिरामध्ये चार दिवस जरांगे पाटील यांच्या उपोषणाला पाठिंबा म्हणून अन्न व पाणी त्याग अशोक पोकळे व साई पोकळे यांनी उपोषण केले. श्री क्षेत्र नारायण गड येथीली दसरा मेळाव्या संदर्भात १८ पगड जातींना, आष्टी पाटोदा शिरूर तालुक्यातील ७७ गावांमध्ये जाऊन सायकल वरती जाऊन जनजागृती व निमंत्रण दिले .तसेच ज्या गावी अंधार पडेल त्याच गावी मुक्काम असे निमंत्रण दिले व नारायणगड ते अंतरवली सराटी मराठ्यांचे दैवत संघर्ष योद्धा मनोज दादा जरांगे पाटील यांच्या दर्शनासाठी १३ तारखेला पोहोचले.

पाटलांच्या सर्व आंदोलनात कायम दिसायचे

मराठा आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून मराठा सेवक अशोक पोकळे हे अख्ख्या महाराष्ट्राने पाहिलं आहे. म्हणूनच आपल्या हक्काचा, स्वाभिमानी, विश्वासाचा, आपला उमेदवार म्हणून अशोक पोकळे यांच्याकडे आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेतील जनता पहात आहे त्यामुळे पाटलांनी जनतेचा विचार करून अशोक पोकळे यांना उमेदवारी जाहीर करावी अशी अशी मागणी आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातील १८ बागड जातीच्या जनतेकडून होत आहे मागणी

आदरणीय जरांगे पाटील यांनी घेतलेला निर्णय सर्वांनाच मान्य आहे. आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेची निवडणूक अशोक पोकळे यांनी लढवावी अशी मराठा मुस्लिम दलित ओबीसी व अठरापगड जातींच्या जनतेची मागणी होत आहे .

**जाहीर प्रगटन**

मा.श्रीमती सुनयना एस. पिंगळे, दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात. किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक १५२२/२०२४

अर्जदार :- १. गौतम पि. पांडुरंग पवार, वय-६३ वर्षे, व्यवसाय-पेन्शनर, २. ओंकार पि गौतम पवार, वय-२८ वर्ष, व्यवसाय ..... दोघे रा. जाधव पेट्रोल पंपाजवळ, मसरत नगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड.

प्रकरण :- भारतीय वारसा कायदा कलम २२८ प्रमाणे प्रोबेट प्रमाणपत्र मिळणेसाठी.

अर्जदारांचे असे म्हणणे आहे की. पांडूरंग खंडेराव पवार, रा. बीड हे दि. ०१/०९/२०२४ रोजी बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क ०१ हा मयताचा मुलगा असुन अर्जदार क ०२ हा मयताचा नातु आहे म्हणजेच अर्जदार क ०१ चा मुलगा आहे.

अर्जदारांचे असे ही म्हणणे आहे की, मयत पांडूरंग खंडेराव पवार, यांनी दि.०९/०७/२०२१ रोजी अर्जदार यांचे नावे मालमत्तेचे वाटप केलेले आहे. त्यासाठी मयत यांनी मृत्युपत्र नोंदवलेले आहे.

सदर मृत्युपत्राआधारे अर्जदारांना ग्रामपंचायत कुसळंब ता पाटोदा जि बीड मधील मालमत्ता क ४६४, लांबी पुर्व-पश्चित ७२ फुट व रुंदी दक्षिणोत्तर ६८ फुट, ज्यांचे एकुण क्षेत्रफळ ४८९६ चौ. फुट म्हणजे ४५५.०१ चौ.मी. आहे, ज्यामध्ये ३००० चौ.फुट म्हणजे २७८.८१ चौ.मी क्षेत्रफळाचे आर.सी.सी. दोन मजली बांधकाम आहे व ४२०० चौ. फुट म्हणजेच ३९०.३३ चौ.मी. क्षेत्रफळाचे १६८ पत्रे बांधकाम आहे व बाकी खुली जागा आहे. तसेच सर्व्हे नंबर २८३ क्षेत्र ३ हे.२८ आर पुर्ण पो.ख.० हे. २० आर पुर्ण ३ हे ४८ आर तसेच सर्व्हे नंबर २८८/अ मधील ० हे ०५ आर अशी एकुण ०३ हे ५३ आर व एल ए आर डी नंबर

१०६/२०१९ मधील मयताने केलेल्या मागणी रक्कम २५,२९,०१४/- च्या वसुली साठी वरील सर्व मिळकती व रक्कम उपभोग घेण्यासाठी अर्जदार क ०१ व ०२ यांना प्रोबेट प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क ०१ व ०२ शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाही असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना प्रोबेट प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/१०/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीख २७/११/२०२४

आदेशावरून
स्वाक्षरित
अधिक्षक
दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड

शिक्का

स्वाक्षरित
क. लिपीक.

# भीमाशंकरला साकारतेय स्ट्रॉबेरी क्लस्टर

## २५८ शेतकऱ्यांना १ कोटी २० लाख ७४ हजार रुपयांचे अनुदान मंजूर

**भीमाशंक । प्रतिनिधी**

**पुणे जिल्ह्याच्या पश्चिम घाट परिसरातील दुर्गम आदिवासी भागातील शेतकऱ्यांच्या जीवनात गुलाबी क्रांती येणार आहे. पारंपारिक पिकांना पर्याय म्हणून स्ट्रॉबेरी सारख्या नगदी पिकातून शेतकऱ्यांना शाश्वत उत्पन्नाचा स्रोत निर्माण होणार आहे. यासाठी आदिवासी उपाययोजने अंतर्गत २५८ शेतकऱ्यांना १ कोटी २० लाख ७४ हजार रुपयांचे अनुदान मंजूर झाले आहे.**

पुणे जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयाने आंबेगाव तालुक्यातील आदिवासी शेतकऱ्यांसाठी स्ट्रॉबेरी प्रकल्प राबविण्यासाठीचा प्रस्ताव नाशिक येथील आदिवासी विकास आयुक्तालयास दिला होता. त्यामध्ये एकात्मिक आदिवासी प्रकल्प घोडेगांव अंतर्गत (ता. आंबेगाव, जि. पुणे) अनुसूचित जमातीच्या एकूण २५८ लाभार्थी शेतकऱ्यांना स्ट्रॉबेरी पिकांच्या लागवडीचा प्रस्ताव पाठविला होता. या प्रकल्पामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या जीवनमानात होणाऱ्या बदलावर आदिवासी आयुक्त शासनास अहवाल सादर करणार आहेत. पाच गुंठे जागेच्या प्रकल्पात स्ट्रॉबेरीची रोपे, लागवड साहित्य, ठिबक सिंचन, मल्चिंग पेपर आदी साहित्य शेतकऱ्यांना योजनेतून देण्यात येईल. त्यासाठीचे मार्गदर्शनही कृषी विभागाकडून वेळोवेळी करण्यात येणार आहे. तर प्रति लाभार्थी शेतकऱ्याचा खर्च ४६ हजार ८०० रुपये आहे. तसेच खर्चामध्ये प्रति लाभार्थी सहभाग एकूण प्रकल्पाच्या १५ टक्क्यांप्रमाणे १८ लाख ११ हजार १६० रुपये आहे.

# हरभऱ्याची नवी जात देते प्रति हेक्टर ३२.९ क्विंटल उत्पादन!

**भारतीय कृषी संशोधन संस्थेने हरभरा लागवडीसाठी नवीन सुधारित वाण विकसित केले आहे, जे कमी खर्चात जास्त उत्पादन देण्यास सक्षम आहे. या जातीचे नाव पुसा चना २०२११ देसी असे आहे. हरभऱ्याच्या या जातीपासून हेक्टरी ३२.९ क्विंटलपर्यंत उत्पादन मिळू शकते.**

सरकार डाळी आणि तेलबियांच्या सुधारित जातींच्या पेरणीला चालना देत आहे जेणेकरून देशात डाळी आणि तेलबियांचे बंपर उत्पादन घेता येईल. हे लक्षात घेऊन कडधान्य पिकांच्या नवीन सुधारित जातीही कृषी शास्त्रज्ञ आणि कृषी विद्यापीठांनी विकसित केल्या आहेत. या मालिकेत हरभऱ्याची ही नवीन जात शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणार आहे. जाणून घेऊ या जातीची वैशिष्ट्ये.

**जातीची वैशिष्ट्ये :**

ही जात २०२१ मध्ये केंद्रीय विविधता प्रकाशन समितीने लागवडीसाठी प्रसारित करण्यात आलेली होती. हरभऱ्याची ही जात गुजरात, महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशसाठी शिफारस करण्यात आलेली आहे. पुसा चना २०२११ देशी (पुसा मानव) हरभऱ्याची ही जात १०८ दिवसात काढणीला येते. ही जात मर रोगास अत्यंत प्रतिरोधक आहे. तसेच हे वाण मूळकुज, कॉलर रॉट, आणि शेंगा पोखरणाऱ्या अळीला मध्यम प्रतिरोधक आहे. या जातीची रब्बी हंगामात वेळेवर पेरणी आणि सिंचनासाठी शिफारस करण्यात आली आहे. या जातीच्या १०० बियांचे वजन सुमारे १९.५ ग्रॅम आहे. या जातीमध्ये प्रथिनांचे प्रमाण १८.९ टक्के असल्याचे आढळून आले आहे. या देशी जातीचे सरासरी उत्पादन २३.९ क्विंटल प्रति हेक्टर आहे. त्याचे जास्तीत जास्त उत्पादन ३२.९ क्विंटल प्रति हेक्टर पर्यंत मिळू शकते.

# शेतकऱ्यांच्या फायद्याची प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजना

**राष्ट्रीय फलोत्पादन अंतर्गत प्लास्टिक मल्चिंग अनुदान योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत फळझाडांना, पालेभाज्या पिकांसाठी मल्चिंग म्हणून वापरण्यात येणारी प्लास्टिक फिल्मयावर अनुदान दिले जात आहे.**

पिकात मल्चिंगचा वापर केल्यामुळे जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन टाळले जाऊ शकते. पिकामध्ये तणांची वाढ देखील ही त्यामानाने कमी होते. त्यामुळे प्लास्टिक मल्चिंग पेपरचा उपयोग हा फळझाडांच्या आणि पालेभाज्यांची पिके घेताना केला जातो. जाणून घेऊ या योजनेविषयी माहिती.

**प्लास्टिक मल्चिंग पेपरसाठी अनुदान :**

अनुदान हे सर्वसाधारण क्षेत्रासाठी प्रति हेक्टर रुपये ३२,००० असून या खर्चाच्या ५० टक्के म्हणजेच जास्तीत जास्त १६,००० रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे कमाल दोन हेक्टर क्षेत्र मर्यादेपर्यंतच अनुदान देय आहे. जर डोंगराळ क्षेत्र असेल, तर प्रति हेक्टर हे ३६,८००/- रुपये मापदंड असणार आहे. या खर्चाच्या ५० टक्के म्हणजेच जास्तीत जास्त १८,४००/- रुपये प्रति हेक्टर याप्रमाणे दोन हेक्टर क्षेत्र मर्यादितसाठी अनुदान देय असणार आहे.

**योजनेसाठी कोण सहभागी होऊ शकते :**

शेतकरी, बचत गट, शेतकरी उत्पादक कंपनी, शेतकरी समूह, सहकारी संस्था या योजनेमध्ये सहभागी होऊन अर्थसहाय्य घेऊ शकतात.

**अनुदान योजनेसाठी आवश्यक कागदपत्रे :**

आधार कार्डची छायाप्रत, आधार संलग्न असलेल्या बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स, ७/१२ उतारा, ८-अ प्रमाणपत्र.

**येथे करता येतो अर्जे :**

या योजनेच्या अधिक माहितीसाठी कृषी सहाय्यक, तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक मंडळ, कृषी अधिकारी, यांच्याशी संपर्क करावा. या योजनेची अधिक माहिती मिळवावी.

**विविध पिकांकरिता**

**प्लास्टिक फिल्मची जाडी :**

ज्या पिकांना ११-१२ महिने कालावधी लागतो. म्हणजे उदाहरणार्थ पपई यांसारख्या फळपिकांना ५० मायक्रोन जाडीची युव्ही प्लास्टिक फिल्म वापरली जाते. ३-४ महिन्याच्या कालावधीत येणारे पिकांसाठी म्हणजेच उदाहरणार्थ भाजीपाला, स्ट्रॉबेरी इत्यादींसाठी २५ मायक्रोन जाडीची यूवी स्टॅबिलायझर फिल्म वापरली जाते. जास्त कालावधी घेणारी पिके म्हणजेच १२ महिन्यांपेक्षा अधिक कालावधी घेणाऱ्या सर्व पिकांसाठी १०० किंवा २०० मायक्रॉन जाडीची यु व्ही स्टॅबिलायझर प्लास्टिक फिल्म वापरली जाते.

# कोंबड्यांना येणारा ताण; कारणे आणि त्यावरील उपाय!

अंतर्गत शारीरिक कार्य सामान्यपणे करण्यासाठी कोंबड्या विविध वर्तणूक आणि चयापचय यंत्रणा वापरते, यालाच कोंबड्यातील ''ताण'' असे म्हणतात. व्यावसायिक कोंबडी पालनातील कोंबड्यांना अशा परिस्थितीचा सामना करावा लागतो. कोंबडीच्या ताणाचा कळपाच्या एकूण आरोग्यावर आणि उत्पादकतेवर लक्षणीय परिणाम होतो. त्यामुळे तणाव निर्माण करणारे घटक समजून घेणे गरजेचे आहे. हे घटक ओळखणे आणि त्यांचे व्यवस्थापन करणे हा यशस्वी पोल्ट्री उत्पादनाचा एक महत्त्वाचा भाग आहे.

**कोंबड्यांना ताण येण्याची कारणे**

अचानक हवामानातील बदलामुळे

कोंबड्यांना ताण येऊ शकतो आणि प्रतिकारशक्ती कमकुवत होऊ शकते आणि ते संवेदनशील बनतात. वेगवेगळ्या कारणांमुळे कोंबड्या पुरेशा प्रमाणात आहार घेत नसतील तर ताण येऊ शकतो. खाद्य, आहारात पुरेशा पोषक तत्वांचा अभाव किंवा इतर घटक यामुळे सुद्धा ताण येतो. वजन वाढणे, कमी होणे किंवा वृद्धत्व यासारख्या घटनांमुळे तणाव निर्माण होतो. कोंबड्यांना पकडताना, विशिष्ट औषधे देताना किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेले जाते, तेव्हा त्यांना भावनिक ताण येतो. रोग बरा करण्यासाठी दिलेल्या औषधांमुळे आणि कालावधीमुळे देखील ताण येऊ शकतो

**कोंबड्यांचे ताण**

**घालवण्यासाठी उपाय :**

कोंबड्यांमधील ताण घालवण्यासाठी किंवा कमी करण्यासाठी प्रत्येक कोंबडीला किती जागा लागते हे पाहून आपल्याजवळील उपलब्ध जागेनुसार एकूण कोंबड्यांची संख्या ठरवावी. तुमच्याकडे उपलब्ध असलेल्या जागेच्या आधारे कोंबडीची एकूण संख्या निश्चित करा. लहान जागेत जास्त गर्दी केल्याने वातावरणातील अमोनियाचे प्रमाण वाढते. शिवाय पक्षी एकमेकांच्या सानिध्यात असल्याने रोगाचा प्रादुर्भाव लवकर होतो. यावर उपाय म्हणून लिटरची स्वच्छता करावी. पावसाळ्यात आणि जास्त आर्द्रता असताना लिटर कोरडे ठेवावे. वातावरणातील बदलानुसार शेडमध्ये पडदे लावणे, पोती बांधणे या गोष्टींची वेळेवर काळजी घ्यावी. ताण घालवणारे औषधे तज्ज्ञांच्या सल्ल्याने द्यावीत. आहारातून किंवा पाण्यातून जीवनसत्वांचा पुरवठा केल्यास ताण कमी होतो. कोंबड्यांना ताण असताना त्यांना लसीकरण करू नये. प्रथम कोंबड्यांवरील ताण कमी करावा आणि नंतरच लसीकरण करावे.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

३१२ ई.पूर्व : कॉन्स्टन्टाइन द ग्रेट यांना विजन ऑफ द क्रॉस प्राप्त झाले असे म्हटले जाते.
१९०४ : न्यूयॉर्क शहरात मेट्रो रेल्वेची सुरुवात झाली होती.
१९४७ : जम्मू-काश्मीर भारतात विलीन झाले.
१९५८ : पाकिस्तानमध्ये जनरल अयुब खानने लश्करी उठाव करून राष्ट्राध्यक्ष इस्कंदर मिर्झा यांना पदच्युत केले.
१९६१ : मॉरिटानिया आणि मंगोलियाचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९७१ : डेमॉक्रॅटिक रिपब्लिक ऑफ काँगो या देशाचे नाव बदलुन झैरे असे करण्यात आले.
१९८२ : चीन देशाने आपल्या देशातील जनसंख्या एक अरब पेक्षा जास्त असल्याची घोषणा केली.
१९८६ : युनायटेड किंगडमने आर्थिक बाजारपेठांवरील सर्व निर्बंध काढुन टाकले.
१९९१ : तुर्कमेनिस्तानला (रशियापासुन) स्वातंत्र्य मिळाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८११ : शिवन कामाच्या मशीनचे पेटेंट घेणारे महान अमेरिकन शोधक, अभिनेता आणि व्यावसायिक आयझॅक मेरिट सिंगर यांचा जन्मदिन.
१८५८ : थिओडोर रुझव्हेल्ट अमेरिकेचे २६ वे राष्ट्राध्यक्ष, नोबेल पारितोषिक विजेते (मृत्यू: ६ जानेवारी १९१९)
१८७३ : महाराष्ट्रीयन मराठी कवी भास्कर रामचंद्र तांबे यांचा जन्मदिन.
१८७४ : भास्कर रामचंद्र तथा भा. रा. तांबे कवी (मृत्यू: ७ डिसेंबर १९४१)
१९०४ : जतींद्रनाथ तथा 'जतिन' दास स्वातंत्र्यसेनानी व क्रांतिकारक (मृत्यू: १३ सप्टेंबर १९२९)
१९२० : के. आर. नारायणन भारताचे १० वे राष्ट्रपती (मृत्यू: ९ नोव्हेंबर २००५)
१९२३ : अरविंद मफतलाल उद्योगपती (मृत्यू: ३० आक्टोबर २०११)
१९४७ : महान महराष्ट्रीयन समाजसेवक तसचं, महाराष्ट्रातील थोर कुष्ठरोगी समाजसेवक बाबा आमटे यांचे चिरंजीव डॉ. विकास आमटे यांचा जन्मदिन.
१९४७ : डॉ. विकास आमटे समाजसेवक
१९५४ : अनुराधा पौडवाल पार्श्वगायिका
१९६४ : मार्क टेलर ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू
१९६६ : अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय माजी बुद्धीबळपटू दिबेंदू बारू यांचा जन्मदिन.
१९७६ : भारतीय-अमेरिकन शेफ आणि लेखक मनीत चौहान यांचा जन्म.
१९७७ : कुमार संगकारा श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९८४ : इरफान पठाण भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६०५ : अकबर तिसरा मुघल सम्राट (जन्म: १४ आक्टोबर १५४२)
१७९५ : सवाई माधवराव पेशवा (जन्म: १८ एप्रिल १७७४)
१९०७ : भारतीय स्वतंत्रता सेनानी, ब्रह्मज्ञानी, व पत्रकार तसचं, स्वामी विवेकानंद यांचे वर्गमित्र आणि रवींद्रनाथ टागोर यांचे सहकारी ब्रह्मबांधव उपाध्याय यांचे निधन.
१९३७ : 'संगीतरत्न' उस्ताद अब्दुल करीम खाँ किराणा घराण्याचे संस्थापक व सवाई गंधर्वांचे गुरु (जन्म: ११ नोव्हेंबर १८७२)
१९६४ : वैकुंठ मेहता सहकारी चळवळीचे प्रवर्तक (जन्म: २६ आक्टोबर १८९१)
१९७४ : चक्रवर्ती रामानुजम गणिती (जन्म: ९ जानेवारी १९३८)
१९८७ : विजय मर्चंट क्रिकेटपटू, क्रिकेट समालोचक, उद्योगपती व समाजसेवक (जन्म: १२ आक्टोबर १९११)
१९९९ : हिंदी भाषेचे प्रमुख आलोचक व साहित्यकार डॉ. नगेंद्र यांचे निधन.
२००१ : भास्कर रामचंद्र तथा भा. रा. भागवत बालसाहित्यकार, विज्ञानकथाकार, 'फास्टर फेणे' आणि 'बिपीन बुकलवार' या पात्रांचे जनक (जन्म: ३१ मे १९१०)
२००१ : प्रदीप कुमार हिन्दी व बंगाली चित्रपटसृष्टीतील अभिनेता (जन्म: ४ जानेवारी १९२५)
२००७ : सत्येन कप्पू हिन्दी चित्रपटांतील चरित्र अभिनेता (जन्म:१९३१ पतियाळा, पंजाब)
२०१५ : भारतीय औषधीशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक रानजीत रॉय चौधरी यांचे निधन. (जन्म: ४ नोव्हेंबर १९३०)

# पिकांचे अवशेष जाळण्यापेक्षा त्यावर करा प्रक्रिया

**भारतात बहुतेक भागात अजूनही पाचट किंवा पिकांचे उरलेले अवशेष अजूनही जाळले जाते, जे पर्यावरणास हानीकारक असते. परंतु हे अवशेष आणि पाचट नाविन्यपूर्ण पद्धतींद्वारा मौल्यवान संसाधनात रूपांतरित केले जाऊ शकते, ज्यामुळे शेतकऱ्यांना नफा तर वाढेलच शिवाय पर्यावरणाचे सुद्धा संवर्धन होईल.**

पीक कापणीनंतर लाखो टन पेंढा तयार होतो, जो सामान्यत: जाळला जातो. या प्रथेमुळे वायू प्रदूषण तर होतेच, शिवाय जमिनीचे आरोग्य बिघडते, आणि कृषी उत्पादकतेवर नकारात्मक परिणाम होतो. पाचट किंवा पिकांचे अवशेष यांचे योग्य व्यवस्थापन करून या कृषी उप-उत्पादनाला शाश्वत शेतीसाठी वापरून यातून शेतकरी नफा कमवू शकतात. हे परिवर्तन साध्य करण्यासाठी ११ नाविन्यपूर्ण मार्ग आहेत.

**जमिनीच्या पोषणासाठी**

**सेंद्रिय कंपोस्ट :**

पिकांचे अवशेष किंवा पाचट जाळण्याऐवजी, त्यापासून कंपोस्ट खत निर्मिती करून जमिनीला आवश्यक पोषक तत्त्वे देऊ शकता ज्यामुळे जमिनीची सुपीकता आणि पिकांचे उत्पादन वाढते. एक एकर जमिनीतून २-३ टन अवशेष मिळते यापासून सुमारे १.५ टन कंपोस्ट खत करता येते. यामुळे रासायनिक खताचा वापर ३०% पर्यंत कमी होतो. जर भारतातील २५% पीक अवशेष कंपोस्टमध्ये रूपांतरित केले तर दरवर्षी ५ दशलक्ष टन कृत्रिम खतांची बचत होऊ शकते.

**कचऱ्यापासून बायोगॅस**

**ऊर्जा उत्पादन :**

बायोगॅससाठी पिकांचे अवशेष ही उत्कृष्ट सामग्री आहे, जी ग्रामीण भागात स्वयंपाक करण्यासाठी स्वच्छ ऊर्जा प्रदान करते. यामुळे जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी होऊन भारताच्या ग्रामीण ऊर्जेच्या २०-२५% गरजा पूर्ण होऊ शकतात.

**मशरूम लागवड :**

मशरूम लागवडीसाठी गवत हे सब्सट्रेट म्हणून काम करते, ज्याला जास्त मागणी आहे. एक टन गवतावर २००-३०० किलो मशरूम निर्मिती होते. मशरूमच्या प्रत्येक कापणीतून १०,०००-१५,०००

रूपये उत्पन्न मिळवता येते.

**जनावरांचा चारा :**

पेंढा हा कमी किमतीचा चारा म्हणून एक चांगला पर्याय आहे ज्यामुळे पशुखाद्य खर्चात बचत होऊ शकते. पेंढा जनावरांना देण्या अगोदर त्यावर प्रक्रिया केल्यास अधिक पौष्टिक चारा तयार करता येतो. यामुळे पशुधन निरोगी राहतील शिवाय पशुपालकांच्या खर्चात सुद्धा बचत होईल.

**कागद आणि पॅकेजिंग**

**साहित्य निर्मिती :**

गवत, व पिकांचे उरलेले अवशेष यांचा वापर पर्यावरणपूरक कागद टिकाऊ पॅकेजिंग साहित्य निर्मिती करण्यात येऊ शकतो. सध्या दिवसेंदिवस अशा पर्यावरणपूरक साहीत्यांची मागणी वाढताना दिसत आहे. भारतातील पीक अवशेषांपैकी फक्त १०% अवशेष रूपांतरित केल्यास देशातील ७०% कागदाची मागणी पूर्ण होऊ शकते, ज्यामुळे अब्जावधी रूपयांचा उद्योग निर्माण होईल.

**बायोचार- माती सुधारक उत्पादन :**

खोडापासून बनवलेल्या बायोचारमुळे मातीचे आरोग्य वाढते आणि कार्बन उत्सर्जित होते. त्याचा वापर पीक उत्पादनात १०-२०% वाढ करू शकते आणि भारतातील हरितगृह वायू उत्सर्जन ५% पर्यंत कमी करू शकतो.

**इको-फ्रेंडली बांधकाम फायबर :**

पीक अवशेषांचा वापर पर्यावरणपूरक विटा आणि पटल यांसारख्या टिकाऊ बांधकाम साहित्यात केले जाऊ शकते. यामुळे पारंपारिक बांधकाम संसाधने यांचा २०% कमी वापर होऊन पर्यावरणपूरक हरित पद्धतींना हातभार लागतो.

**बायोइथेनॉल इंधन उत्पादन :**

खोडाचे बायोइथेनॉलमध्ये रूपांतर केल्याने स्वच्छ-जळणारा नूतनीकरण योग्य इंधन स्रोत उपलब्ध होतो. देशात वर्षभर तयार होणार्या पीक अवशेषापासून सुमारे १०० अब्ज लिटर इथेनॉल तयार होऊ शकते. यामुळे पेट्रोलियम आयात २०% कमी होऊन शेतकऱ्यांसाठी ६०,००० कोटींचा महसूल निर्मिती होऊ शकते.

**बायोएनर्जी वीज निर्मिती :**

नूतनीकरणक्षम वीज निर्मितीसाठी बायोमास पॉवर प्लांटमध्ये गवताचा वापर केला जाऊ शकतो. एक टन गवतापासून वीज निर्माण होऊ शकते.

**इको-फ्रेंडली औद्योगिक पुठ्ठा उत्पादन**

पीक अवशेषांवर प्रक्रिया करूनपारंपारिक पॅकेजिंग मटेरियलला इको-फ्रेंडली पुठ्ठा हापर्याय उपलब्ध करता येते. शाश्वत पॅकेजिंगची मागणी वार्षिक ६.५% वाढण्याची शक्यता आहे, ज्यामुळे शेतकर्यांना आर्थिक संधी उपलब्ध होतील.

**मृदा संवर्धनासाठी मल्चिंग :**

शेतातील पालापाचोळा आच्छादन किंवा मल्चिंग म्हणून वापरल्यास जमिनीतील पाण्याचे बाष्पीभवन कमी करून आणि ओलावा टिकवून धरून मातीचे आरोग्य सुधारते. हे तंत्र पाण्याचा वापर २५% कमी करू शकते आणि पीक उत्पादन १५-२०% वाढवू शकते. भारतीय शेतीमध्ये पाणी व्यवस्थापनात यामुळे क्रांती घडू शकते.

# शेतात कपाशी , सोयाबीन लाऊन मोसंबी,डाळींबाचा विमा उतरवला बोगस फळबाग विमा प्रकरणी फौजदारी गुन्हे दाखल करा

## कृषी संचालक कृषी आयुक्तालय विनयकुमार आवटेंना तक्रार -डॉ.ढवळे

बीड । प्रतिनिधी

संपूर्ण महाराष्ट्रात बोगस पिक विमा रॅकेट सक्रिय असतानाच आता प्रत्यक्षात फळबाग अस्तित्वात नसतानाही अनेकांनी फळबागांचा विमा भरला आहे तर काहींनी कमी फळबाग क्षेत्र असताना जास्त क्षेत्राचा विमा भरला आहे तर काही ठिकाणी धक्कादायक बाब म्हणजे शेतात कापुस, सोयाबीन,मका अशी पिके असताना आधिक पैसे मिळवण्यासाठी पीक विमा मात्र मोसंबी, डाळींब अशा पिकांचा काढण्यात आल्याची गंभीर बाब निदर्शनास आली असुन कृषी विभागाने ५ जिल्ह्यात केलेल्या तपासणीत हा प्रकार समोर आला आहे.त्यामुळे राज्यातील सर्व फळबागांची पाहणी करण्याचे आदेश कृषी विभागातील अधिकाऱ्यांना दिले असुन संबंधित प्रकरणात शासनाची दिशाभूल आणि आर्थिक फसवणूक करणारांवर फौजदारी कारवाई करण्यात यावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी विनयकुमार आवटे;कृषी संचालक ( विस्तार व प्रशिक्षण) कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांना केली आहे.

राज्यात पीक विम्याप्रमाणे फळबागांचाही विमा उतरवला जातो.पुनरर्चित हवामान आधारित फळ पीक विमा योजनेंतर्गत मृग बहार २०२४ मध्ये राज्यातील २५ जिल्ह्यातील एकुण ७३ हजार ७७७ शेतकऱ्यांनी विविध फळबागांचा विमा भरला आहे मात्र अनेक ठिकाणी प्रत्यक्षात फळबाग नसताना फळबागचा विमा भरल्याची तसेच क्षेत्र कमी असताना जास्त क्षेत्राचा विमा भरल्याच्या तक्रारी कृषी विभागाकडे आलेल्या होत्या त्यानंतर कृषी आयुक्तांनी १६, १७ व १८ ऑक्टोबर रोजी आयुक्तालयातील १० पथकांकडून बीड , जालना, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर आणि सांगली या ५ जिल्ह्यातील काही शेतकऱ्यांच्या फळबागांची तपासणी केली होती यात धक्कादायक बाबी आढळून आलेल्या आहेत.

जास्त लाभासाठी फळबाग नसताना काढला विमा

कृषी आयुक्तांच्या सुचनेनुसार आयुक्तालयातील १० पथकांनी ३ दिवस पाहणी केली असता यात १३६ ठिकाणी (३८ टक्के) फळबागाच अस्तित्वात नसताना विमा भरला गेला.व याठिकाणी प्रत्यक्षात कापूस, सोयाबीन,मका, अशी पिके होती.तर ५५ ठिकाणी ( १५ टक्के) फळबागेचे क्षेत्र कमी असताना विमा मात्र आधिक क्षेत्राचा भरला होता.१८ ठिकाणी ( ५ टक्के) ठिकाणी बाग उत्पादन क्षम नसतानाही विमा भरला होता.५ ठिकाणी ( १ टक्के) एकाच क्षेत्रावर एकापेक्षा जास्त फळपिकांचा विमा भरला होता.१४८ ठिकाणी ( ४१ टक्के) ठिकाणीच योग्य पद्धतीने विमा भरल्याचे तपासणीत आढळून आले.

आढावा घेतलेली ठिकाणे

बीड जिल्ह्यातील आष्टी, जालना जिल्ह्यातील अंबड,बदनापुर, घनसावंगी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठण, छत्रपती संभाजीनगर तालुका, अहिल्यानगर जिल्ह्यातील त्याच तालुक्यात तर सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यात ही तपासणी करण्यात आली होती.

राज्यभर तपासणीचे कृषी संचालक विनयकुमार आवटे यांचे आदेश

फळबागांच्या विम्या बाबतीत सर्वसाधारण तपासणीत अनेक गंभीर बाबी आढळून आल्या असुन पिक वेगळे असताना फळ पिकांचा विमा भरल्याच्या घटना हि अतिशय गंभीर बाब आहे.त्यामुळे राज्यातील सर्वच फळबागांची तपासणी करून ३१ आक्टोबर पर्यंत अहवाल देण्याचे आदेश कृषी विभागाचे संचालक विनयकुमार आवटे यांनी दिले आहेत.

# भाजपात दिग्गजांना बेदखल केले जाते तर सामान्यांची काय गत -राजेश देशमुख

## भाजपच्या प्राथमिक सदस्यत्वाचा दिला राजीनामा; पत्रकार परिषदेत घोषणा

**परळी । प्रतिनिधी**

मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला असल्याने आता या पक्षाचा आणि माझा कसलाही संबंध उरलेला नाही. इथल्या नागरिकांच्या आशा आणि अपेक्षा सत्ताधाऱ्यांना पूर्ण करता आल्या नाहीत. त्याचा आम्ही पूर्णतः अभ्यास केल्याने मध्यंतरीच्या काळात शरदचंद्र पवार यांच्याकडे आम्ही उमेदवारी मागण्यांसाठी भेटलो आहोत. इथल्या संपूर्ण परिस्थितीची त्यांना सविस्तर माहिती देण्यासाठी शिष्टमंडळ सोबत घेऊन आम्ही मुंबई येथे त्यांची भेट घेतली. मागील काळात पंकजाताई यांच्यासोबत आम्ही काम करण्याचं ठरवल होत मात्र आता बीड जिल्ह्यात हा पक्ष शिल्लक राहतो की नाही अशी अवस्था आहे. जिथे

पंकजाताई मुंडे यांच्यासारख्या दिग्गज नेत्यांना त्या पक्षात नजरांदाज केले जाते तर आमच्या भवितव्याचा इथे विचार केला जाणार नाही असे वाटल्याने आता आम्ही ज्या मूळ पुरोगामी विचारांच्या पक्षात काम करत होतो तिथेच परत येऊन काम करण्याचे मी ठरवले असल्याचे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख यांनी पत्रकार परिषदेत म्हटले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडे मी उमेदवारी देण्यासाठी मागणी केली आहे. त्यांनी सकारात्मक भावना व्यक्त केली आहे मात्र त्यांचा जो निर्णय असेल तो आम्हाला मान्य असेल. परळी विधानसभा मतदारसंघातील परिस्थिती बदलायची असेल तर आता शरद पवारांच्या पाठीशी राहून पुरोगामी विचारांचा उमेदवार या विधानसभा निवडणुकीत निवडून आणावा लागेल. जरांगे पाटलांनाही आम्ही भेटलो आहोत, ते काही ठिकाणी निवडणूक लढवणार आहेत तर काही ठिकाणी सक्षम उमेदवारांना पाठिंबा देणार अशी त्यांची भूमिका आहे. त्यांचा विशिष्ट पक्ष नाही किंवा त्यांचे ठराविक असे चिन्ह नाही. त्यांनी सर्वांनाच उमेदवारी दाखल करायला लावले आहे. सारासार विचार करूनच ते अंतिम निर्णय घेतील. शरदचंद्र पवार साहेबांचा पक्ष रास्त विचारांवर काम करणारा पक्ष आहे असे आम्हाला वाटते. ते सर्वांचे ऐकतात, समजून घेतात आणि आलेल्या प्रत्येकाला न्याय देण्याचा प्रयत्न करतात ह्या गोष्टी मला विशेष वाटतात. मला हे सर्व आवडल्याने त्यांच्या सोबत जाण्याचा आम्ही विचार केला आहे. स्व.गोपीनाथराव मुंडे यांनी उभा केलेला भारतीय जनता पक्ष फार लवकर बीड जिल्ह्यातून संपत आहे याच आम्हाला दुःख वाटत. अगोदर आम्ही मी भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा देऊन नंतर पवार साहेबांच्या पक्षात प्रवेश करणार असल्याने आज मी अधिकृतपणे राजीनामा दिला आहे असे ज्येष्ठ नेते राजेश देशमुख म्हणाले.

# विद्यार्थ्यांनी आजच्या स्पर्धेच्या युगात संगणकाचे ज्ञान आत्मसात करावे- प्राचार्य राऊत डी.डी.

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयामध्ये १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त आदित्य कॉम्प्युटर्सचे संचालक प्रा.बाबासाहेब आडे सर यांनी प्राथमिक व माध्यमिक अशा दोन गटांमध्ये सामान्य ज्ञान स्पर्धा परीक्षेचे आयोजन केले होते .

या स्पर्धेच बक्षीस वितरण गुरुवार दि.२४ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराणी ताराबाई विद्यालयामध्ये करण्यात आले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य डी.डी.राऊत तर कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आदित्य कॅम्पुटर सेंटर संचालक प्रा.बाबासाहेब आडे तसेच उपप्राचार्य मस्के अ.रं,पर्यवेक्षक धाईतिडक पी.एम,श्री.डोईफोडे आर.एस.प्रा.सी.व्ही मुंडे व श्री.धस यु.एम.आदीजन मान्यवर म्हणून उपस्थित होते. मान्यवरांच्या शुभहस्ते या स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय,तृतीय क्रमांक आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह,कंपासपेटी शैक्षणिक



साहित्य देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

या कार्यक्रमाचे मान्यवर म्हणून उपस्थित असलेले श्री.डोईफोडे सर यांनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.त्यानंतर अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डी.डी.राऊत म्हणाले की, विद्यार्थ्यांनी संगणकाच्या व स्पर्धेच्या जगात वावरताना वेगवेगळे संगणकाचे कोर्सेस आत्मसात केले पाहिजेत,चतुर्थ श्रेणी पदाची जरी नोकरी हवी असेल तर संगणकावर परीक्षा घेतली जाते यासाठी संगणकाचे ज्ञान असणे जिवनात अविभाज्य घटक बनले आहे. हे समोर ठेवून आज विद्यार्थ्यांनी संगणक ज्ञान मिळवण्यासाठी दिवाळीच्या सुट्ट्यांचा सदुपयोग करावा असे मार्गदर्शन केले तसेच २० नोव्हेंबरला होत असलेल्या विधानसभा निवडणुकीत मतदानासाठी विद्यार्थ्यांनी आपल्या आई,बाबा,आजी,आजोबा यांना मतदान केंद्रापर्यंत घेऊन जाऊन मतदान करून घेण्यासाठी प्रवृत्त करावे असे मार्गदर्शन प्रा.सी.व्ही मुंडे व प्राचार्य राऊत डी.डी यांनी केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.आडे सर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री.विष्णू आंधळे यांनी केले व उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक धाईतिडक सर यांनी मानले. या कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

## || थोडक्यात

### विभागस्तरीय शालेय योगा स्पर्धेत घवघवीत यश

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

परभणी येथे झालेल्या विभागस्तरीय शालेय योगासन क्रिडा स्पर्धेत सरस्वती पब्लिक स्कुलच्या अक्षय श्रीहरी वाघमारे याने तृतीय क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेत आपला सहभाग निश्चित केला आहे. परभणी येथे नुकत्याच क्रिडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रिडा परिषद परभणी व परभणी जिल्हा योगासन स्पोर्ट्स असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विभागस्तरीय शालेय योगासन क्रिडा स्पर्धा सन-२०२४-२५ संपन्न झाल्या. या स्पर्धेत श्री सरस्वती पब्लिक स्कूलचा विद्यार्थी अक्षय श्रीहरी वाघमारे याने १४ वर्षे वयोगटाखालील विद्यार्थ्यांमध्ये तृतीय स्थान पटकावून अंबाजोगाई तालूका व बीड जिल्ह्याच्या शिरपेचामध्ये मानाचा तुरा रोवला आहे. हा विद्यार्थी आता लातूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय योगासन क्रिडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर विभागाच्या वतीने खेळणार आहे. या विद्यार्थ्यास योगशिक्षक उत्तरेश्वर पांचाळ, योगा कोच शरद बोंदर, क्रिडा शिक्षक बसवराज मल्यानीकर यांनी मार्गदर्शन केले. अक्षयच्या यशाबद्दल माईर्स एम. आय. टी. चे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ.वि.दा.कराड कार्यकारी संचालक राजेश कराड, व्यवस्थापन समिती सदस्या शुभांगी कराड, संचालक संगप्पा तलेवाड, प्राचार्य सागर राऊत यांच्यासह इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थ्याचे अभिनंदन केले आहे.

### श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा आमटे अभिषेक याची राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी निवड

**बीड । प्रतिनिधी**

येथील श्री बंकटस्वामी महाविद्यालयाचा खेळाडू आमटे अभिषेक हनुमान याची शालेय तायक्कांदो राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.नुकत्याच जिल्हा क्रीडा संकुल,बीड येथे पार पडलेल्या विभागीय स्पर्धेत आमटे अभिषेक हनुमान याने सतरा वर्ष वयोगटात ४५ ते ४८ किलोग्रॅम वजनी गटात उत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपद पटकावून बालेवाडी (पुणे) येथे होणाऱ्या राज्यस्तरीय तायक्कांदो स्पर्धेसाठी आपले स्थान निश्चित केले.आमटे अभिषेक याच्या यशस्वी कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विवेक मिरगणे,कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ब्रम्हनाथ मेंगडे,क्रीडा विभाग प्रमुख डॉ.शंकर धांडे ,डॉ.जगन्नाथ चव्हाण, कार्यालयीन अधीक्षक श्री शिवाजी भारती,श्री कल्याण सावंत तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# खोलेश्वर महाविद्यालयात 'मतदान जागृती' ची शपथ

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील खोलेश्वर महाविद्यालयात विद्यार्थी ,प्राध्यापक ,शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वतः मतदान करून इतरांना मतदान करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी मतदान जागृतीची शपथ घेतली. यावेळी व्यासपीठावर खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे अध्यक्ष विजयराव वालवडकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी, वरिष्ठ विभागाचे उपप्राचार्य डॉ. बिभीषण फड , डॉ.दीपक फुलारी ,व्यवसाय शिक्षण अभ्यासक्रमाचे उपप्राचार्य रवींद्र कुंबेफळकर, कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य आनंद पाठक, या उपक्रमाचे समन्वयक प्रा.दत्तप्रसाद गोस्वामी , ब्रँड अँबेसेटर विद्यार्थी चि.पार्थ उपरे व चि. पृथ्वीराज पांचाळ यांची उपस्थिती होती.

नोव्हेंबर २०२४ मध्ये येऊ घातलेल्या विधानसभेच्या निवडणुकीत जास्तीत जास्त मतदान व्हावे यासाठी समाजात जनजागृती व्हावी या उद्देशाने मा. जिल्हाधिकारी , बीड तथा निवडणूक अधिकारी कार्यालय, बीड यांच्या सूचनेनुसार, डतएएझ नियोजनानुसार नवमतदार व इतरांमध्ये जागृती करण्याविषयी महाविद्यालयाच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याचाच एक भाग म्हणून मतदारांमध्ये मतदानाविषयी जाणीव जागृत व्हावी या उद्देशाने महाविद्यालयात मतदारांना मतदान जागृतीची शपथ देण्यात आली. याबरोबर कु.गायत्री कदम व कु. मृदूला दामोशन यांनी मतदार जागृती विषयक तयार केलेल्या पोस्टरचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात प्रा. डॉ. तात्या पुरी यांनी शपथ पत्राचे वाचन करून उपस्थित मतदारांना शपथ दिली. यावेळी महाविद्यालयात विद्यार्थी, प्राध्यापक , शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# व्यापारी महासंघा तर्फे बंब व बजाज यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी**

श्री हस्तीमलजी बंब यांची व्यापारी महासंघ (कॅट) च्या मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी व सुखदेव बजाज यांची सचिव पदी बिनविरोध निवड झाल्या बद्दल जिल्हा व्यापारी महासंघा तर्फे सत्कार समारोहचा कार्यक्रम दि. २५ ऑक्टोबर रोजी श्री बंब यांच्या कार्यालयात अति उत्साहात पार पडला. प्रारंभी शहराध्यक्ष सतिश पंच प्रस्तावित करताना व्यापारी संघटना (कॅट) उद्योग व्यवसाय करणार्या लोकांच्या हितात काम करणारी राष्ट्रीय स्तरीय एकमेव नोंदणीकृत संघटना आहे. या संघटनेचे प्रमुख प्रवीण खंडेलवाल नुकतेच लोकसभेच्या निवडणुकीत चांदणी चौक, दिल्ली येथुन प्रचंड बहुमताने खासदार पदी निवडणु आले. मागील हप्त्यात त्यांनी व्यापार्यांच्या राष्ट्रीय अधिवेशन दिल्ली येथे आयोजित केले होते. त्या अधिवेशनात जालना जिल्ह्याचे श्री बंब यांच्या कार्याचा आढावा पाहून राष्ट्रीय अध्यक्ष बी. सी. भरतिया व राज्याध्यक्ष सचिन निवंगुणे यांनी श्री बंब यांची मराठवाडा विभागीय अध्यक्षपदी नियुक्ती केली. बंब मुळेच जालना जिल्हा व्यापारी

महासंघ राज्यात आघाडीवर आहे. म्हणूनच जालना जिल्ह्याला उत्कृष्ट कार्याबद्दल राज्यस्तरीय पुरस्कार मिळालेला आहे. श्री बंब यांनी सामाजिक कार्यात, संघटनेत संपुर्ण महाराष्ट्रात समर्पित भावनाने काम केले आहे, जालना जिल्ह्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. पुढील वेळी मराठवाडा नंतर बंब यांनी राज्याचे नेतृत्व करावे असे पंच म्हणाले व शुभेच्छा दिल्या. श्री अंकुश राऊत, महिला आघाडीची अध्यक्षा सौ. सीता मोहिते पाटील यांनी आपले विचार मांडले व जिल्हा तर्फे बंब व बजाज यांचा भव्य सत्कार करण्यात आला. सत्कारास उत्तर देताना बंब म्हणाले जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील ग्रामीण भागात वारंवार दौरे व संपर्क करून प्रत्येक गावात व्यापार्यांची संघटना उभारण्यात आली. सभासद प्रमाणपत्र, ओळखपत्र, प्रत्येक गावात कार्यालय, स्वागत फलक, महिला आघाडी, जण गणना, निर्देशिका मोफत विमा योजना या सर्व कार्यामुळेच राज्य स्तरीय पुरस्कार, मराठवाडा अध्यक्ष पदी निवड करण्यात आली आहे. जालना पॅटर्न मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यात राबऊ, अंतिम श्वासा पर्यंत समाजासाठी, गरजुंसाठी, व्यापार्यांच्या हितार्थ काम करीत राहीन. मिळालेले पद, सत्कार माझे एकट्याचे नसुन यात सर्वांचे कष्ट आहे, असे बंब म्हणाले. या समारोहासाठी प्रमोद जोशी, रामभाऊ मोहिते, सुभाष सोनुने, लक्ष्मण मोहिते यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार सचिव प्रविण मोहता यानी मांडले.

# रामलिंग पतसंस्थेकडून सभासदांना १५ टक्के लाभांशासह किराणा कीटचे वाटप

वडवणी । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या.ता.वडवणी यांच्या वतीने दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी दिपावली सणाच्या पूर्वी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १३ लक्ष ५४ हजार ४७४ रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या एकुण १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि.२२ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी संस्थेचे संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे. दरम्यान रोख लाभांशासह मोठ्या प्रमाणात सणानिमित्त फराळ बनवण्यासाठी साहित्य असलेल्या किराणा कीट मिळाल्याने सर्व सभासदांची यंदाची दिवाळीही आणखीनच गोड झाली असून त्यांच्या आनंदात अधिकची भर पडली आहे.

संपूर्ण बीड जिल्ह्यातील सहकार क्षेत्रात नामांकित असलेल्या वडवणी येथील रामलिंग नागरी सहकारी पतसंस्था मर्या.ता.वडवणी यांच्या वतीने दि.२८ सप्टेंबर २०२४ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तरतूद व घोषित केल्याप्रमाणे प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी संस्थेच्या सभासदांना १५ टक्के लाभांश रक्कम व दिवाळी सणासाठी फराळ किराणा कीटचे वाटप करण्याचे सप्टेंबर महिन्यातील वार्षिक सर्वसाधारण सभेत जाहीर करण्यात आले होते. त्याप्रमाणे आता

दिपावली सणाच्या पूर्वीच संस्थेच्या सभासदांना १५ टक्के प्रमाणे एकुण १३ लक्ष ५४ हजार ४७४ रुपये लाभांश रक्कमेच्या वाटपाचा तसेच सभासदांसाठीच्या एकुण १० लक्ष रुपये रक्कमेच्या दिपावली फराळ किराणा कीटांचे वाटपाचा शुभारंभ दि.२२ ऑक्टोबर २०२४ मंगळवार रोजी संस्थेचे संचालक मंडळ व मान्यवरांच्या हस्ते उपस्थित सभासदांना रोख लाभांश व किराणा कीट देत करण्यात आला. याप्रसंगी चेअरमन नारायणराव डिगे, व्हाईस चेअरमन सुरेशराव ढवळशंक, व्यवस्थापक दिगांबरजी गुरसाळी, माजी चेअरमन कचरुशेठ झाडे, माजी व्हाईस चेअरमन सर्जेराव महाराज आळणे, सर्वश्री संचालक नवनाथराव म्हेत्रे, अरुणराव गुरसाळी, प्रकाशराव डिगे, उपमन्यूजी वारे, सुभाषराव वाव्हळ, बाबासाहेब मस्के, श्रीमती.सिताबाई रामभाऊ डिगे, सौ.रंजनाताई शिवाजीराव टकले, सौ.शैलजाताई अर्जुनराव भंडारे यांच्यासह सभासद बांधव कोष्टी समाजाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर माऊली रोकडे, गुरुप्रसाद गुरसाळी, दत्तात्रय वीर, शिवाजीराव टकले, अर्जुनराव भंडारे, वैजिनाथ डिगे, बाबुराव खाटोकर, सुदामराव गलांडे,

किसनराव फासे, आश्रुबा मुंडे, कैलास भुजबळ, दत्तात्रय पारखे, लक्ष्मणराव भंडारे, गणेशराव डिगे, वल्लभप्रसाद गुरसाळी, विश्वनाथ दिवटे, अनिल आलगट, दिलीप शिंदे, सुभाष टिकुळे, रामेश्वर रेडेकर, विठ्ठल वरवडे, संजय खटावकर, राम बाबर, दगडू गुरसाळी, नारायण टिपरे यांसह पतसंस्थेचे कर्मचारी सचिन म्हेत्रे, सोमेश्वर मस्के, ईश्वर ढवळशंक, राहूल बागडे, अविनाश वाव्हळ, लखन टिकुळे, अल्पबचत ठेव प्रतिनिधी ज्ञानेश्वर गुरसाळी, ज्ञानेश्वर डिगे, अजय भैरट, विजय हेंद्रे, केशव टकले, डिगांबर झाडे, शिवाजी लोकरे व इतर सभासद व ग्राहक मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते. रामलिंग पतसंस्थेच्या वतीने या दिवाळीमध्येही सर्व सभासदांना लाभांश रक्कम तसेच फराळ किराणा कीटांचे वाटपही होत असल्याने सर्व सभासदांची दिवाळी प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही गोड होत आहे. तरी ज्या सभासद बांधवांचे लाभांश व किराणा कीट घेवून जाणे बाकी आहे, अशांनी पतसंस्थेत येवून आपली लाभांश रक्कम व किराणा कीट हस्तगत करावी असे आवाहन चेअरमन नारायणराव डिगे यांनी केले आहे. दरम्यान रोख लाभांशासह मोठ्या प्रमाणात दिवाळी फराळ बनवण्यासाठी उपयुक्त साहित्य असलेल्या किराणा कीट मिळाल्याने सर्व सभासदांची यंदाचीही दिवाळी आणखीनच गोड झाली असून त्यांच्या आनंदात अधिकची भर पडली आहे. रामलिंग पतसंस्थेच्या या दायित्व व सहकार्याबध्दल सभासद बांधवांनी पतसंस्थेच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन करुन आभार मानले आहेत.

# महाविकास आघाडीचे उमेदवार बदामराव पंडित यांना विजयी करण्यासाठी पिंपळनेर सर्कलमधील शिवसैनिक कामाला लागले

बीड । प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार), काँग्रेस व मित्र पक्ष,महाविकास आघाडी गेवराई विधानसभेचे अधिकृत उमेदवार बदामरावजी आबा पंडित यांच्या प्रचारार्थ पिंपळनेर येथील सिद्धिविनायक गणपतीस नारळ फोडत दर्शन घेऊन आज विधानसभा मतदारसंघात प्रचारास प्रारंभ करत प्रचाराच्या पहिल्या दिवशी पिंपळनेर सर्कल मधील नाथापूर, रंजेगाव,, शहाजानपूर, लोणी,रामगाव, सांडरवण, लिंबारुई, पाटेगाव, पिंपळादेवी, बेडूकवाडी, मुगगांव, सूर्डी (थोट),बोरदेवी, नबापूर, केसापुरी, परभणी, ताडसोन्ना,घाटजवळा, वलीपुर, पिंपळनेर या सर्व गावांमध्ये माजी मंत्री बदामराव आबा पंडीत व शिवसेनेचे दोन्ही जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर व जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉर्नर बैठका पार पडल्या..

लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी महाराष्ट्रात पुन्हा एकदा जनतेच्या विचारांचे महाविकास आघाडीचे सरकार सत्तेवर आणण्यासाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण मला मतदान रुपी आशीर्वाद देऊन आमदार म्हणून मला संधी द्या असे आवाहन भावी आमदार बदामराव पंडीत यांनी मतदार बांधवांशी केले.

याप्रसंगी बोलताना शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले कि येणाऱ्या काळात बीड जिल्ह्यामध्ये अनेक लोकांचे प्रवेश महाविकास आघाडीमध्ये होत आहेत आपण बघितले असेल या राज्यामध्ये व देशामध्ये मोदी, फडणवीस आणि शिंदे यांचे सरकार होते या सरकारने सर्व सामान्य

माणसाला, शेतकऱ्याला देशोधडीला लावण्याचे काम केले आहे. शेतकऱ्यांच्या कापुस, सोयाबीन असे अन्य पिकांचे भाव कवडीमोल करून ठेवले आहे. म्हणून या सरकारला कायमच घरी बसवण्यासाठी येणाऱ्या २० तारखेला मशाल या चिन्हासमोरील बटन दाबून माजी मंत्री बदामराव आबा पंडित यांच्या रूपाने

## जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख गणेश वरेकर

महाविकास आघाडीला आशीर्वादरुपी मतदान करून जास्तीत जास्त लीडने आमदार करायचे आहे.

जिल्हाप्रमुख गणेश भाऊ वरेकर यांनीही सर्वांना मार्गदर्शन करत आपल्या सर्वांच्या हक्काचे लोकनेते म्हणजेच बदामराव आबांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणावे.

याप्रसंगी बीड तालुक्याचे तालुकाप्रमुख गोरख आण्णा सिंघण, माजी जिल्हा परिषद सभापती पंढरीनाथ बापू लगड,सखाराम तात्या मोहिते, कैलासजी राठोड, प्रभू तात्या नांदे, विठ्ठल नांदे, बाळासाहेब नागटिळक, राम शिंदे, विनोद गूंड पाटील, अजय गायकवाड, ऋषिकेश गिरी, सोफीयान शेख,शकील भाई पठाण, सुग्रीव सोजे, ऋषिकेश माठे महाराज ,रुद्रा मते, महेश मते,अमोल देवडकर, अश्विन लांडे, अशोक घुमरे, अर्जुन वाघ, राजेंद्र सातपुते, झुंबर जाधव, मारोती जाधव, पटू इंगोले, कैलास थोटे, बोरदेवी चे सरपंच रवी आरसुळ, राजू नाडे, सिद्धेश्वर नरवडे, उमेश आनेराव, गणेश नरवडे, संजय बप्पा नरवडे, अली शेठ कुरेशी, गोविंद शिंदे सह सर्व गावातील मतदार बंधू मोठ्या संख्येने उपस्थित होते...!!

# राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

## बीडमधून संदीप क्षीरसागर

मुंबई । प्रतिनिधी

मोठी बातमी समोर येत आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून विधानसभेसाठी आपल्या उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जंयत पाटील यांनी पत्रकार परिषदेत उमेदवारांच्या नावाची घोषणा केली. दुसऱ्या यादीमध्ये एकूण २२ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. पहिल्या यादीमध्ये राष्ट्रवादी शरद पवार गटाकडून ४५ उमेदवारांच्या नावाची घोषणा करण्यात आली

होती. त्यानंतर आता दुसरी यादी समोर आली आहे.

दुसऱ्या यादीमध्ये अकोल्यामधून अमित भांगरे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर एरंडोलमधून सतिश पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. गंगापूरमधून सतिश चव्हाण यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. पर्वतीमधून आश्विनी कदम, बीडमधून संदीप क्षीरसागर, माळशिरसमधून उत्तम जाणकर यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे.

**राष्ट्रवादीच्या उमेदवारांची यादी**

एरंडोल - सतीश अण्णा पाटील, गंगापूर -सतीश चव्हाण, शहापूर- पांडुरंग बरोरा, परांडा -राहुल मोटे, बीड -संदीप क्षीरसागर, आर्वी - मयुरा काळे, बागलान - दीपिका चव्हाण, येवला - माणिकराव शिंदे, सिन्नर- उदय सांगळे, दिंडोरी - सुनीता चारोस्कर, नाशिक पूर्व - गणेश गीते, उल्हासनगर- ओमी कलानी, जुन्नर - सत्यशील शेरकर, पिंपरी - सुलक्षणा शीलवंत, खडकवासला - सचिन दोडके, पर्वती - अश्विनीताई कदम, अकोले- श्री अमित भांगरे, अहिल्यानगर शहर - अभिषेक कळमकर, माळशिरस - उत्तमराव जानकर, फलटण - दीपक चव्हाण, चंदगड - नंदिनीताई भाबुळकर कुपेकर, इचलकरंजी - मदन कारंडे.

# आष्टीचे चित्र बदलण्याची ताकद फक्त इथेच!

## संघर्ष योद्धा जरांगे पाटील यांचा आदेश आला तर आष्टीचे चित्र सतीश शिंदे बदलू शकतात!

पाटोदा । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघात राजकीय रस्सीखेच जोरदार सुरू आहे. भाजप राष्ट्रवादीमध्ये तर अटीतटीचा सामना तिकिटासाठी सुरू आहे. भीमराव धोंडे नी तर यातून वेगळी भूमिका घेत अपक्ष उमेदवार अर्ज दाखल केला आहे. आमदार बाळासाहेब आजबे व सुरेश धस यांच्यात महायुतीचे तिकीट कुणाला यावरून तर कवितर्क लावले जात असून तुतारीचा उमेदवार अचानक महेबूब शेख यांना मिळाल्याने आता चौरंगी लढत होण्याची शक्यता आहे. परंतु संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी जर सतीश आबा शिंदे यांना उमेदवारी दिली तर आष्टीचे चित्र नक्कीच बदलेल असा विश्वास सर्वसामान्य जनतेला आहे.

### जरांगे पाटलांचा आदेश आला तर सतीश शिंदे आमदारचं!

आष्टी विधानसभा निवडणुकीमध्ये जरांगे पाटलांनी सतीश शिंदे यांच्या रूपाने जर उमेदवार दिला तर आमदार सतीश शिंदेच होणार यात शंकाच नाही. सध्या महायुतीकडून बाळासाहेब आजबे भीमराव धोंडे सुरेश धस हे इच्छुकांमध्ये आहे तर भीमराव धोंडे यांनी आपली वेगळी चूल मांडत अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे. तर आघाडी कडून तुतारीची उमेदवारी महेबूब शेख यांना मिळाल्याने जरांगे पाटलांचा उमेदवार निवडून येईल यात शंका नाही परंतु ही माळ सतीश शिंदे यांच्या गळ्यात पडणं गरजेचे आहे. पाटलांची माळ सतीश शिंदे यांच्या गळ्यात पडल्यास आष्टीला आमदार सतीश शिंदे यांच्या रूपाने मिळेल अशी चर्चा मतदारसंघात जोरदार सुरू आहे.

आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाचा आमदार तर मनोज जरांगे पाटील सांगतील तोच होणार यात शंका नाही परंतु ही निवडणूक चौरंगी होणार का पंचरंगी होणार हे आता २९ तारखेला जाहीर होईल. महायुतीमध्ये आमदार बाळासाहेब आजबे सुरेश धस भीमराव धोंडे हे तीन उमेदवार इच्छुक आहेत तर आघाडी करून तुतारीची उमेदवारी

महेबूब शेख यांना जाहीर झाल्याने ही निवडणूक पंचरंगी होण्याची शक्यता आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी सतीश शिंदे यांना उमेदवारी दिल्यास आष्टी चा आमदार सतीश शिंदे यांच्या रूपाने पाटलांचाच होईल यात शंका नाही. आता पाटील २९ तारखेला काय निर्णय घेणार याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे तोपर्यंत महायुती आघाडीचे उमेदवार सलाईनवर आहेत.

# सुरेश धसांचा दुसरा राजकीय बॉम्ब गोळा

## ...तर दुसऱ्या उमेवाराचा प्रचार करणार : सुरेश धस

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी विधानसभा मतदारसंघाचा महायुतीचा पेच सुटत नसून, यामुळे येथे राजकीय वातावरण तापलं आहे. कालच माजीमंत्री सुरेश धस यांनी निर्णय होत नसेल तर सुट्टा खेळ होऊ द्या असे म्हटले आहे. तर आज त्यांनी फेसबुक या सोशल मीडियावर प्लेट फॉर्मवर पोस्ट करत पक्षाने आदेश दिला तर दुसऱ्या उमेवाराचा प्रचार करीन असे म्हटले आहे. यामुळे धस यांचा हा दुसरा राजकीय बॉम्ब गोळा असल्याची चर्चा होत आहे. यानंतर दुसऱ्या उमेदवाराचा म्हणजे नेमका कोणाचा प्रचार करणार या चर्चेला आता तोंड फुटलं आहे.



आष्टी विधानसभा मतदारसंघाचे राष्ट्रवादी काँग्रेस ए.पी. युती मित्र पक्षाचे सध्या विद्यमान आमदार बाळासाहेब आजबे असून ही जागा त्यांनाच सुटावी हा आग्रह आहे. वजनदार समजलें जाणारे सुरेश धस येथून भाजपाकडून निवडणूक लढविण्यासाठी इच्छूक आहेत. यामुळे भाजपा आणि राष्ट्रवादी काँग्रेस (ए.पी.) या दोघांमध्ये रस्सीखेच सुरू आहे. यामुळे या जागेचा पेच सुटण्याचे नाव घेत नसून, दोन्ही पक्षांकडून ही जागा प्रतिष्ठेची केली आहे. तर माजीमंत्री सुरेश धस यांची कालच समर्थकांची बैठक झाली. यामध्ये त्यांनी पक्षाने तिघाही इच्छुकांना लढण्याची परवानगी द्यावी अन्? एकदा सुट्टा खेळ होऊन कोण किती पाण्यात होऊन जाऊद्या असे आवाहन केले. तरीही अद्याप काही निर्णय न झाल्याने सुरेश धस यांनी आजही एक राजकीय बॉम्ब गोळा ◀◀ पान ३ वर

# माजलगावमधून भाई थावरे यांनी भरला अर्ज

माजलगाव । प्रतिनिधी

शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी दि २५ ऑक्टोबर शुक्रवार रोजी माजलगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष उमेदवारी अर्ज भरला आहे.

शेतकरी नेते भाई गंगाभिषण थावरे यांनी आपले आयुष्य वंचित, कष्टकरी, शेतकऱ्यांसाठी वाहिले आहे.या सर्व घटकांच्या प्रश्नासांठी भाई थावरे गेल्या अनेक वर्षांपासून आंदोलन,मोर्चे काढून शासन दरबारी मागण्या मांडून त्यांची सोडवणूक करत आहेत.यामुळे माजलगाव मतदारसंघात तळागाळातील कार्यकर्ता म्हणून थावरे यांची ओळख निर्माण झाली असून त्यांना मानाणारा मोठा वर्ग या मतदारसंघात ◀◀ पान ३ वर

# विकासाच्या मुद्द्यावरच निवडणुक लढवणार -आ.कैलास गोरंटयाल

जालना । प्रतिनिधी

विकासाच्या मुद्द्यावरचं आपण विधानसभेची निवडणूक लढणार असून शहरातील जनतेला दररोज पाणी पुरवठा करण्याबरोबरच जालन्यात एखादे विद्यापीठ मंजूर करण्याचा प्रयत्न केला जाईल अशी ग्वाही जालना विधानसभा मतदार संघातील महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार आ.कैलास गोरंटयाल यांनी आज शनिवारी पत्रकारांशी बोलतांना दिली.

जालना विधानसभा मतदार संघातून आज शनिवारी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी जाहीर करण्यात आल्यानंतर आपल्या प्रितीसुधा नगर येथील निवासस्थानी ते

पत्रकारांशी बोलत होते. काँग्रेस पक्षाच्या वतीने आपल्याला सहाव्यांदा जालना विधानसभेची उमेदवारी दिल्याबद्दल गोरंटयाल यांनी सर्वप्रथम पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, पक्षाच्या नेत्या श्रीमती सोनिया गांधी, विरोधी पक्षनेते खा.राहुल गांधी, प्रियंका गांधी, पक्षाचे ज्येष्ठ नेते वेणुगोपाल, पक्षाचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेनीथला, पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले, पक्षाचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात, विजय वडेट्टीवार आर्दीचे आभार व्यक्त करून आपण केलेल्या कामाची ही पावती असल्याचे सांगितले. मागील काळात आपण जालना शहरातील पाण्याचा प्रश्न मार्गी लावला असून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करून ते सुरू होण्यासाठी केलेल्या पाठपुराव्याला आणि प्रयत्नांना मोठे यश मिळाले. विधानसभेच्या निवडणुकीला सामोरे जातांना विकासाचे मुद्दे हाच आपला अजिंठा राहणार आहे. शहरातील ◀◀ पान ३ वर

# पक्षाने काहीच निर्णय घेतला नाही तर अपक्ष लढण्यासाठी तयार राहा-सुरेशकुमार जेथलिया

## शहरात पदयात्रा व भव्यशक्ती प्रदर्शन

जालना । प्रतिनिधी

आपल्या काँग्रेस पक्षाने मला विधानसभेची उमेदवारी नाकारून जो अन्याय केलेला आहे तो येत्या दोन दिवसात दूर न झाल्यास अपक्ष निवडणूक लढण्यास तयार राहा असे आव्हान परतुरचे माजी आमदार सुरेश कुमार घेतल्या यांनी आयोजित पदयात्रेनंतर कार्यकर्त्यांना संबोध करताना केले.

परतुर विधानसभेची जागा काँग्रेसचे असताना काँग्रेस उमेदवार सुरेश कुमार घेतलेल्या यांच्यावर अन्याय करीत शिवसेनेला सोडल्याने नाराज झाले झालेल्या सुरेश कुमार जेथलिया यांनी आज भव्य पदयात्रेचे आयोजन करून कार्यकर्त्यांची बैठक घेतली या बैठकीत मार्गदर्शन करताना माजी आमदार सुरेश कुमार जेथलिया म्हणाले की, दहा वर्षात सत्तेत नसताना अहोरात्र जनतेची कामे करत आलो. तरी आपली हक्काची जागा असताना या ठिकाणी शिवसेनेचा उमेदवार देण्यात आला. आपल्याला विधानसभेची उमेदवारी नाकारून काँग्रेस पक्षांनी माझ्याबरोबरच कार्यकर्त्यांवरही अन्याय केला आहे त्यामुळे दोन दिवसात काही निर्णय झाला नाही तर आपण या निवडणुकीला कार्यकर्त्यांच्या आग्रह असतो अपक्ष सामोरे जाऊ ही निवडणूक महत्त्वाची व प्रतिष्ठेची आहे. त्यामुळे तुम्हीच निर्णय घ्या. असे सांगून कार्यकर्त्यांनी कुकर चिन्ह घ्या असे म्हणताच आ. जेथलिया म्हणाले की मी कुकरवर जरी निवडून आलो तरी पंजा सोडणार नाही कारण हा पंजा सर्व जाती धर्माला घेऊन चालणारा काँग्रेस पक्षाचा आहे. मी फक्त तुमच्यासाठी लढणार आहे तुम्हीच निर्णय घ्या असेही माजी आमदार सुरेश कुमार जेथलीया यांनी सांगितले. यावेळी परतूर आष्टी मंठा ◀◀ पान ३ वर

# मनोज दादा जरांगे पाटलांनी सरपंच अशोक पोकळे यांना उमेदवारी द्यावी

पाटोदा । प्रतिनिधी

जिल्ह्यातील विधानसभेच्या निवडणुकीत चांगलीच रंगत आलेली पाहायला मिळत आहे. बीड जिल्ह्यातील अनेक मतदारसंघातील वेगवेगळ्या पक्षाचे उमेदवार जाहीर झाले आहेत. तरीदेखील संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेतात याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे. खास करून आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेसाठी उमेदवार कोण यावर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. परंतु सर्वसामान्य जनतेच्या तोंडी अशोक पोकळे यांचेच नाव समोर येत आहे. त्यांनाच उमेदवारी जाहीर करावी अशी मराठा समाज बांधवांची व येथील जनतेची मागणी आहे.

संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून आज तागायत अशोक पोकळे सावलीप्रमाणे त्यांच्या पाठीशी

### आष्टी पाटोदा शिरूर जनतेची मागणी

असल्याने त्यांनाच उमेदवारी देण्यात यावी अशी मागणी होत आहे.

मराठा सेवक अशोक पोकळे यांनी युवकांना एकत्रित करून आणि अडचणीत धावून जाणं आणि मदत करणं हौ त्यांची पहिल्यापासूनच असलेली ओळख आजतगायत मोठ्या प्रमाणावर पसरली आहे. संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाच्या पहिल्या दिवसापासून खंबीरपणे सावली सारखं उभ असलेलं अख्ख्या महाराष्ट्राने पाहिलं आहे. आष्टी पाटोदा शिरूर मराठा मुस्लिम दलित समाजामध्ये त्यांची चांगलीच ओळख असून त्यांना उमेदवारी मिळाली तर मोठ्या मताने निवडून येतील असा जनतेचा विश्वास आहे. मराठा मुस्लिम दलित समाजामधून देखील त्यांच्या नावाला पसंती मिळत असून उमेदवारी जाहीर करून आष्टी पाटोदा शिरूर विधानसभेला हक्काचा स्वाभिमानी ,संघर्षशील उमेदवार द्यावा अशी मागणी सुद्धा होत आहे.

पाटलांचा आदेश आल्यावर निवडणूक लढणार अन् जिंकणार- अशोक पोकळे

गरजवंत मराठ्यांच्या लेकरांसाठी आपला जीव पणाला लावून लढणारा आमचा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील त्यांचे खांदे समर्थक अशोक राजेंद्र पोकळे चिंचाळा, तालुका आष्टी ,जिल्हा बीड. येथील असून त्यांनी लॉंळेव-१९ हे जगावर महाभयंकर संकट आले होते. या काळात २०२०- २१ मध्ये हजारो रुग्णांना मदत केली ,धीर दिला व जीवदान मिळवून दिले. वाढदिवसानिमित्त २०२१ यावर्षी ५० टक्के अनुदानावर १२४० घरगुती पिठाच्या गिरण्या गोरगरिबांना वाटप केल्या.वाढदिवसानिमित्त २०२२ यावर्षी ३४ गावांमधील ३२०० महिलांना मोहटा देवीचे मोफत देवदर्शन घडवले. परिसरातील पितृछत्र हरवलेल्या दहा मुलांना दत्तक घेतले. व त्यापैकी दोन मुलींचे कन्यादानही केले.

तसेच परिसरातील ब्रह्मगाव, आंबेवाडी, मंगरूळ ,देसूर, बीड सांगवी, ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आगीमध्ये १० एकर ऊस खाक; शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान

**पुणे । प्रतिनिधी**

काठापूर बुद्रुक (ता. आंबेगाव) येथे शॉर्टसर्किटमुळे शुक्रवारी (दि. २५) लागलेल्या आगीत १० एकर ऊस खाक झाल्याने शेतकर्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले. या शेतकर्यांना नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. काठापूर परिसरात गेल्या एक महिन्यात शॉर्टसर्किटमुळे उसाचे नुकसान झाल्याची ही दुसरी घटना आहे.

काठापूर बुद्रुक येथे शुक्रवारी दुपारी एक वाजेच्या सुमारास विजेच्या तारांमध्ये शॉर्ट सर्किट झाले. त्यामुळे ऊस पिकाला आग लागली. यामध्ये शेतकरी पीयूष दीपक गांधी, गणपत हौजी कांबळे, दत्तात्रय कांबळे, कौसाबाई कुंडलीक करंडे, मधुकर कांबळे, भिवाजी कांबळे, शिवाजी कांबळे व इतर शेतकर्यांच्या शेतातील ऊस जळून गेला. या सर्वांची शेती एकमेकाला लागून असून, या सर्वच १० ते १२ एकरामधील क्षेत्रावर उसाचे पीक होते. या ठिकाणी अचानक वीजवाहक तारांमध्ये घर्षण होत उसाला आग लागली. यामध्ये लाखो रुपयांचे नुकसान झाले. काठापूर बुद्रुक या ठिकाणी महावितरणचे उपकेंद्र आहे. या ठिकाणावरून आजूबाजूच्या परिसरातील गावांना वीजपुरवठा केला जातो. त्यामुळे काठापूर बुद्रुक गावात विजेच्या तारा पसरलेल्या आहेत. अनेक ठिकाणी वीजतारांची उंची कमी आहे, तर काही ठिकाणी तारांना झोळ आहे. त्यामुळे या ठिकाणी आगीच्या अनेक घटना घडत असतात. मागील महिनाभरापूर्वीही अशीच आग लागली होती. महिनाभरात पुन्हा एकदा आगीची घटना घडल्याने १० एकर क्षेत्रावरील ऊस जळाला. तोडणीला आलेला ऊस या घटनेत वाया जाणार आहे. साखर कारखाने अजूनही एक ते दीड महिना सुरू होणार नाहीत. त्यामुळे ऊस कारखाना हा ऊस तोडून नेणार नाही. या घटनेत शेतकर्यांची आर्थिक हानी झाली असून, महावितरणच्या वतीने नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी सरपंच अशोक करंडे व शेतकऱ्यांनी केली आहे.

# ठेकेदारांनी कामगारांना बोनस द्यावा पालिका प्रशासनाला सूचना

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेतील कंत्राटी कामगारांना कंत्राटदार आस्थापनांमार्फत बोनस देण्यात यावा, यासाठी महापालिकेने आदेश द्यावेत. अशी आदेशवजा सूचना सहाय्यक कामगार आयुक्त निखील वाळके यांनी पुणे महापालिकेला केली आहे. गतवर्षीच्या बोनससह यंदाचाही बोनस तत्काळ दिला जावा, असे कामगार आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

महापालिकेच्या वेगेवेगळ्या विभागांत सुमारे नऊ हजार कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत. या कामगारांना किमान वेतनानुसार महापालिकेकडून वेतन अदा केले जाते. त्यात, बोनसाचाही समावेश आहे.

मात्र, हे पैसे महापालिकेकडून ठेकेदारांना दिले जात असले तरी ठेकेदारांकडून ते कामगारांना दिले जात नाहीत. याबाबत राष्ट्रीय मजदूर संघातर्फे कामगार उपायुक्त कार्यालयामध्ये तक्रार दाखल करण्यात आली होती.

या तक्रारीवर घेण्यात आलेल्या सुनावणीत बोनस न देण्याबाबत मनपाकडून कोणतेही ठोस कारण देण्यात आले नाही. सन २०२२-२३ करता मनपा कंत्राटी कामगारांना बोनस द्यावे, असे आदेश तीन नोव्हेंबर २०२३ रोजी पुण्याच्या कामगार उपायुक्तांनी दिले होते. त्यानुसार पुणे महापालिकेच्या मुख्य कामगार अधिकाऱ्यांनी पत्राद्वारे कंत्राटदार आस्थापनांना बोनस अदा करण्याबाबत कळवले होते.परंतु, तरीही २०२३ मध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांना बोनस देण्यात आलेला नाही. ही बाब कामगार कायद्याचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे सन २०२२-२३ व २३-२४ साठीच्या बोनसची रक्कम तातडीने दिली जावी, यासाठी संबंधितांना आदेश द्यावेत,असे सहाय्यक कामगार आयुक्त निखिल वाळके यांनी २४ ऑक्टोबर २४ रोजी पुणे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना कळवले आहे.

# बारा पिंजरे लावूनही बिबट्या जेरबंद होईना; परिसरात भीतीचे वातावरण

**पुणे । प्रतिनिधी**

बिबट्याने केलेल्या हल्ल्यात वंश सिंग या चिमुकल्याचा मृत्यू झाला आहे. सात दिवासांपूर्वी घडलेल्या या घटनेनंतर बिबट्याला पकडण्यासाठी परिसरात १२ पिंजरे वन विभागाने लावले आहेत. परंतु, त्यात बिबट्या जेरबंद झालेला नाही. या घटनेतील पीडित कुटुंबाला वन विभागाच्या माध्यमातून दहा लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे, असे वन विभागाच्या अधिकार्यांनी सांगितले.



बिबट्याच्या हल्ल्यानंतर गेल्या सात दिवसांपासून वन विभागाकडून बिबट्याचा शोध घेतला जात आहे. याबाबत वन विभागाचे अधिकारी भानुदास शिंदे यांनी सांगितले की, वन विभागाने मांडवगण फराटा परिसरात १२ पिंजरे लावले आहेत. ६ ट्रॅप कॅमेरे बसविले आहेत. गेले दोन दिवस ड्रोनद्वारे बिबट्याचा शोध घेतला जात आहे. बिबट्याला लवकरच जेरबंद केले जाईल. या घटनेतील पीडित कुटुंबाला दहा लाख रुपयांच्या मदतीचा धनादेश देण्यात आला आहे. पुढील मदतीची प्रक्रिया महिनाभरात पूर्ण केली जाईल, असे शिंदे यांनी सांगितले. मांडवगण फराटा परिसरातील जुनामळा, पिंपळसुटी, भैरू फराटेवाडी, गायकवाडमळा येथील वस्तीवरील कुत्र्यांवर बिबट्याने हल्ला केला आहे. या परिसरात बिबट्या शेतकर्यांना सातत्याने दिसत आहे. काही नागरिकांच्या गाडीला देखील बिबट्या रात्रीच्या वेळी आडवा गेला आहे, असे सरपंच समीक्षा फराटे पाटील यांनी सांगितले.

## पुण्यातील 'या' परिसरात देहविक्री करणाऱ्या महिलांवर गुन्हा दाखल; नागरिकांच्या तक्रारीनंतर पोलिसांची कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

मुंबई-बंगळुरू बाह्यवळण मार्गावर नवले पूल परिसरात देहविक्रय करणाऱ्या ८ महिलांवर अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गेल्या काही वर्षांपासून या भागात महिला रस्त्याच्या कडेला उभा राहून देहविक्री करत असत. नागरिकांकडून वेळोवेळी कारवाईची मागणी होत होती. पण ठोस कारवाई केली जात नव्हती. मात्र, आता पोलिसांनी थेट गुन्हा नोंदवल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. याप्रकरणी सिंहगड रोड पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याबाबत उपनिरीक्षक सुरेश जायभाय यांनी तक्रार दिली आहे. नवले पूल भागात नवले ब्रिजकडून कात्रजकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला महिला देहविक्रय करत असत.

अंधार पडल्यानंतर या महिला याठिकाणी येऊन उभा राहत असत. त्यानंतर त्या रात्री उशिरापर्यंत उभा राहत होत्या. या रस्त्यावर वर्दळ देखील मोठी आहे. बाजूलाच लॉजेस, हॉटेल आहेत, तर इतरही दुकाने आहेत. त्यामुळे रहिवाशी खरेदीसाठी मोठ्या प्रमाणात येथून ये-जा करत असतात. दरम्यान, या महिला अश्लील हावभाव करत असत. घोळक्याने उभा राहत असल्याने येणाऱ्या जाणाऱ्या रहिवाशी, महिला यांना याचा त्रास होत होता. या महिलांवर कारवाईची मागणी सिंहगड रोड पोलिसांकडे वेळोवेळी केली जात होती. मात्र, त्यावर पोलीस ठोस कारवाई करत नसत. तात्पुरते पोलीस येऊन या महिलांना येथे उभा राहू देत नव्हते. मात्र, येथील नागरिकांच्या रेट्यामुळे अखेर पोलिसांनी या महिलांवर गुन्हा दाखल केला. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे अधिक तपास करत आहेत.

# सुप्रियाताई डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटेंना उमेदवारी द्या विजय निश्चित होईल-पांडुरंग आवारे

**मुबंई । प्रतिनिधी**

दि.२६ ऑक्टोबर २०२४ रोजी मुंबई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या पक्षाच्या कार्याध्यक्षा, संसदरत्न खासदार सौ.सुप्रियाताई सुळे यांची शिवसंग्रामचे पांडुरंग आवारे-पाटील यांनी भेट घेऊन डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांना बीड विधान सभेची उमेदवारी देवुन लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांनी महाराष्ट्रातील सर्व सामान्य घटकातील जन हिताचे स्वप्न पाहिलेले पुर्ण करण्याठी संधी द्यावी म्हणजेच खऱ्या आर्थाने आपल्या सर्वांकडून स्व.विनायकरावजी मेटे साहेबांना श्रद्धांजली ठरेल आशा भावना व्यक्त करून

विनंतीपूर्वक नम्र विनंती केली व अन्य सामाजिक राजकीय विषयावर संवाद साधत चर्चा केली.डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांचा विजय नक्कीच होईल हा विश्वास खा.सुप्रियाताई सुळे यांना दिला व अन्य मेटे साहेबांनी सामाजिक काम केलेल्या अठवणीनां उजाळा देत मेटे साहेबांचा सामाजिक व राजकीय वसा वारसा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे ह्या स्वातावरचे दुःख बाजुला सारून भक्कम पणे पुढे घेऊन जात आहेत सुप्रियाताई आपण व आपल्या महाविकास आघाडीकडून डॉ.ज्योतीताई मेटे यांना बीड विधान सभेची उमेदवारी देवुन काम करण्याची संधी द्यावी विजय नक्कीच होईल असा विश्वास ग्रा.प.सदस्य मानेवाडी,ता.बीड.तथा शिवसंग्राम संपर्कप्रमुख पिंपरी-चिंचवड शहर,पुणे.पांडुरंग आवारे-पाटील यांनी खा.सुप्रियाताई सुळे यांची मुंबई येथे प्रतेक्ष भेट घेऊन त्यांना दिला व शिवसंग्रामचे पांडुरंग आवारेंनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

# ...तर मी राजकीय जीवनाचा संन्यास घेईल', गणेश बीडकर यांच्या गंभीर आरोपावर धंगेकरांचं रोखठोक उत्तर

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत नुकतीच काँग्रेसकडून उमेदवारी जाहीर झालेले कसब्याचे विद्यमानन आमदार रवींद्र धंगेकर यांच्यावर आणि त्यांच्या पत्नीवर शुक्रवारी भाजप नेते गणेश बीडकर यांनी गंभीर आरोप केले. गणेश बीडकर यांनी पत्रकार परिषद घेत रवींद्र धंगेकर यांनी पुण्यातील महत्त्वपूर्ण अशा लक्ष्मी रोडवर मालमत्ता हडपल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या या आरोपामुळे पुण्यातील राजकारणामध्ये एकच खळबळ उडाली आहे, त्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी या आरोपांवर उत्तर देत बीडकरांचे सर्व आरोप फेटाळले आहेत.

गणेश बीडकरांनी केलेल्या आरोपांवर उत्तर देताना आमदार रवींद्र धंगेकर म्हणाले, माझ्यावर भाजपचे नेते गणेश बिडकरांनी आरोप केले. पण गणेश बीडकर यांची पार्श्वभूमी त्यांना माहितीये. बिडकरच्या घरातून भ्रष्टाचाराची नाडी वाहते. लोकसभेच्या निवडणुकीनंतर वक्फ बोर्डाकडून आम्हाला क्लीन चिट मिळाली. खासगी वक्फ बोर्ड होतं. मालकिणीने १९६६ मध्ये कर्ज घेतलं तेव्हा केस चालली. त्यानंतर ही जागा विकायची परवानगी मिळाली आणि त्यानंतर ती जागा विकली त्याचे ४ मालक झाले. यात माझ्यासोबत ५ पार्टनर आहे. पाच लोकांनी जागा १५ वर्षांनी खरेदी केली, अशी माहिती त्यांनी यावेळी दिली आहे. आम्ही नॅशनल बँकेच कर्ज घेतलं, आमच्यावर प्रत्येकी ५ कोटी कर्ज आहे. ज्यांच्यावर मंगळसूत्र चोरीचे पोलीस स्टेशनाला आरोप आहेत. समर्थ पोलीस ठाण्यात हे बॅनर लागले होते. रविवार पेठेतील प्रत्येकाने ते पाहिले आहेत. काल ज्या बीडकरांनी दोन मुस्लीम बांधव सोबत आणले होते ते त्यांच्या मामांचे मुलं आहेत. मी एक जरी भ्रष्टाचार केला असेल तर मी राजकीय जीवनाचा संन्यास घेईल. माझ्या पत्नीवर आरोप केले हे योग्य नाही. याचा सात बारा आमच्याकडे आहेत. माझ्या कुटुंबावर जाऊ नका, आम्ही चोर असेल तर आज जेलमध्ये टाका. आजच गुन्हा दाखल करा. घरावर कर्ज आहे. काही असेल तर आजही जेल मध्ये जाऊ पण आम्हाला डाग लावायचं प्रयत्न करू नका, असं उत्तर धंगेकरांनी गणेश बीडकरांना दिलं आहे.

विधानसभा निवडणूक तोंडावर असल्याने मला बदमान करण्याचा प्रयत्न करत असेल तर करू नका. आमच्यावर तीर मारायचा प्रयत्न करत असाल तर दुसरा तीर आमच्या हातात आहे. बीडकर हा माणूस हा लहान माणूस आहे. पण, यामागे देवेंद्र फडणवीसांचा हात आहे. मला भीक घालण्याचा प्रयत्न करू नका. मी भीक घालू देणार नाही. भाजपात येणार नाही. काँग्रेसचा आहे इथेच राहणार आहे; असा टोला देखील त्यांनी यावेळी फडणवीसांना लगावला आहे.

# शिवरे येथे पुणे-सातारा महामार्गावर अपघात; सात जण जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि ठेकेदारांच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे पुणे - सातारा महामार्गावरील शिवरे येथे अपघात प्रवणक्षेत्र निर्माण झाल्याने वाहतुकीसह अपघात वाढत आहे. शनिवारी सकाळी झालेल्या विचित्र अपघातात चारचाकी वाहनाचा चेंदामेंदा झाला असून मोटारमधील सात जण जखमी झाले आहेत. सर्वजण मुळशी तालुक्यातील असून नसरापूर येथील सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु आहेत. जखमींत दोन लहान मुलींचा समावेश आहे.



कालिदास बाळू मांडेकर वय ३३, प्रतिक्षा कालिदास मांडेकर वय २८, रा. राझी कालिदास मांडेकर वय ५, बाळा कालिदास मांडेकर वय ६ महिने, संगीता बाळू मांडेकर वय ५५ शैला भोते वय ५० सर्व रा. चांदे ता. मुळशी, सुदाम दौंडकर वय ३५ रा. नेरे ( ता. मुळशी ) अशी जखमीचे नाव असून ही घटना शिवरे ( ता. भोर ) येथे पुणे - सातारा महामार्गावर शनिवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास पुणे बाजूला घडली आहे. या अपघातात एक महिला गंभीर असून इतर सर्व जखमी सुरक्षित असल्याचे सिद्धिविनायक हॉस्पिटलचे डॉ. राजेंद्र डिंबळे यांनी माहिती दिली.

अधिक माहिती अशी कि, मांडेकर कुटुंब व इतर नातेवाईक क्र. एम .एच. १२ यू.एस. १७१७ फॉर्च्यूनर या कारमधून मांढरदेवी काळूबाई येथे देवदर्शनासाठी आले होते. परत जात असताना शिवरे ( ता. भोर ) येथील महामार्गावरील खड्डे चुकवत असताना कार दुभाजकाच्या बाजूला टाकलेल्या मातीच्या ढिगाऱ्याला धडकून जोरदार अपघात झाला. या ठिकाणी उड्डाणपुलाच्या कामामुळे येथील वाहतूक वळणाजवळ मधल्या दुभाजकाला लागून मातीचा ढिगारा टाकण्यात आला आहे. त्याला धडकून कार अक्षरशः हवेत उडून उलटली. या गाडीत एकूण सात जण होते. त्यातील एक जण गंभीर जखमी इतर किरकोळ जखमी झाले आहेत. घटनेच्यावेळी शेजारील पेट्रोल पंपातील कामगार व स्थानिकांनी चारचाकी मधील प्रवाशांना बाहेर उपचारासाठी सिद्धिविनायक हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले आहे. मात्र सवयीप्रमाणे वाहतूक पोलीस उशिरा पोहचले. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक यांचे उड्डाणपुलाचे काम करणाऱ्या निखिल कन्स्ट्रक्शन ठेकेदारावर अंकुश नसल्याचे चर्चा होत आहे. अपघातात ठिकाणी ठेकेदाराने रिफ्लेक्टर, दिवे, फलक लावणे आवश्यक होते. मात्र अशी कोणतीही खबरदारी येथे घेण्यात आलेली नाही. याठिकाणी अपघात प्रवणक्षेत्र निर्माण झाल्याने मागील महिन्यात एका महिलेचा मृत्यू झाला होता. आजच्या घटनेत देखील महामार्ग प्राधिकरणसह निखिल कन्स्ट्रक्शन जबाबदार असल्याचे आरोप होत आहे.

# वाघोली येथील गोडाऊन मधुन एकूण एक कोटी नऊ लाख किमतीचे २८० लॅपटॉप चोरी केलेल्या आरोपींना जामीन मंजूर

**पुणे । प्रतिनिधी**

वाघोली येथील अर्कलाईन लॉजिस्टिक्स अँड वेअर हौसिंग प्रा. ली. येथील गोडाऊन मधून लेनोवो कंपनीचे एकूण एक कोटी नऊ लाख किमतीचे २८० लॅपटॉप चोरल्या प्रकरणी पुणे येथील मे. प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांनी या प्रकरणातील तिन्ही आरोपींना २५ हजारांच्या जतमुचकलकावर जामीन मंजूर केला.

दि. ११.१०.२०२४ ते १४.१०.२०२४ च्या दरम्यान अर्कलाईन लॉजिस्टिक्स अँड वेअर हौसिंग प्रा. ली., उबाळेनगर येथून कामगाराने एकूण २८० लॅपटॉप चोरून नेले होते. तपासादरम्यान लोणीकंद पोलीस स्टेशन येथील तपासी अधिकर्यांनी तीन आरोपी नामे १. सुरेश कुमार (रा. उबाळेनगर, वाघोली मुळगाव उत्तर प्रदेश) २. शिवाजी जगन्नाथ वसू ( रा. संभाजीनगर) ३. कुमुद झा (रा. बिहार) यांना अटक करून एकूण २४४ लॅपटॉप हस्तगत केले होते. तदनंतर मे. न्यायलानायाने तिन्ही आरोपींना दि. २१.१०.२०२४ रोजी १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती.

आरोपींच्या वतीने ड. मयुर माळी यांनी सक्षम युक्तिवाद करत बाजु मांडली व मे. कोर्टाने सदर

युक्तिवाद ग्राह्य धरून तिन्ही आरोपींचा जामीन मंजूर केला. सदर प्रकरणात ड. विकास खंदारे यांनी सहकार्य केले.

# नामदेव जाधव यांनी केली नवीन पक्षाची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर केल्या आहेत. जवळपास सर्वच महत्त्वाच्या उमेदवारांची घोषणा झाली आहे. अशातच महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी घडत आहेत. महाराष्ट्रात आणखी एका नवीन पक्षाची स्थापना झाली आहे. 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू' पुस्तकाच्या लेखकाने स्वतःचा पक्ष काढत महाराष्ट्राच्या राजकारणात एन्ट्री केली आहे.

लेखक नामदेव जाधव यांनी स्वतःचा पक्ष काढला आहे. कुणाला विधानसभा निवडणूक लढवायची असेल आणि कोणताच पक्ष उमेदवारी देत नसेल, तर अशांसाठी हा पक्ष एक पर्याय असेल. नामदेव जाधव हे 'शिवाजी द मॅनेजमेंट गुरू' या पुस्तकाचे लेखक आहेत. त्यांनी लोकसभा निवडणूक बारामतीतून लढविली होती. नामदेव जाधव यांनी आता स्वतःचा पक्ष स्थापन केला आहे. 'छत्रपती शासन' असे या पक्षाचे नाव आहे. मागेल त्याला उमेदवारी, असे धोरण त्यांनी विधानसभा निवडणुकीसाठी घोषित केले आहे. नामदेव जाधव स्वतःला राजमाता जिजाऊ माँसाहेबांचे वंशज म्हणवतात. त्यांच्या काही वादग्रस्त विधानांमुळे त्यांच्यावर शाईफेक झाली होती. नामदेव जाधव स्वतःचा पक्ष घेऊन विधानसभा निवडणुकीच्या मैदानात उतरले आहेत

# अवैधरित्या गॅस भरणा, विक्री करणाऱ्यावर छापा

पुणे । प्रतिनिधी

गॅस सिलिंडरचा बेकायदा साठा केला. तसेच एका टाकीतून दुसर्या टाकीत गॅस भरून विक्री करणार्याविरुद्ध गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाने कारवाई केली. या प्रकरणी सुरेश मोहनलाल बिष्णोई (२६ , रा.जुना जकातनाका धानोरी) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस हवालदार अजय गायकवाड यांनी फिर्याद दिली आहे.

लोहगावात एअरपोर्ट रोड आई-माता मंदिराच्या भिंतीलगत शेडमध्ये एक व्यक्ती बेकायदा गॅस सिलिंडरचा साठा करून तो विकतअसल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट चारच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पथकाने तेथे छापा टाकला असता, तेथे सुरेश बिष्णोई आढळला. अनुदानित गॅस सिलिंडरमधून बिष्णोई हा व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरून चढ्या भावाने विक्री करत होता.

पोलिसांनी त्याच्याकडून अनुदानित आणि व्यवसायिक गॅस सिलिंडरच्या टाक्या जप्त केल्या आहेत. पोलीस उपनिरीक्षक वैभव मगदुम यांच्या पथकाने ही कारवाई केली आहे. दरम्यान, यापूर्वी शहरात बेकायदा गॅस सिलिंडरचा साठा करून एका टाकीतून दुसर्या टाकीत भरत असताना आगीच्या घटना घडल्या आहेत.